मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » बुधवार, २६ मार्च २०२५ » वर्ष: ६ » अंक:९७ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## अलीकडचे पुढारी पाया पडायच्या लायकीचे राहिलेले नाही- अजितदादा

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

माजी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस सेवादल अध्यक्ष चंद्रकांत दायमा यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस सेवा दलाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश झाला. हे राज्य पुढे जावो, छत्रपती शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच राज्य पहिल्या क्रमांकावर राहिलं आहे. यशवंतराव चव्हाण साहेबांनी नेहमी राज्याला पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला आहे, असे म्हणत अजित पवारांनी पक्षप्रवेशावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी, गेल्या काही महिन्यांतील घडलेल्या घटनांचा अनुल्लेखाने संदर्भ देत त्यांनी कार्यकर्त्यांना मोलाचा सल्लादेखील दिला आहे. राजकीय नेत्यांबद्दलची जनतेमध्ये असलेली अनास्था खुद्द अजित पवारांच्याही तोंडी पाहायला मिळाली. अलीकडचे पुढारी पाया पडायच्या लायकीचे राहिलेले नाही, त्यामुळे पाया पडायच्या नादात पडू नका असे अजित पवारांनी यावेळी म्हटले.

## अग्राग्रलेख
## खरीखरी

## वानराच्या गळ्यात मोत्याची माळ

सध्या बांगलादेशचे तात्पुरते राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून न आलेल्या मोहम्मद युनूस यांची नेमणूक झालेली आहे. निवडणुकीतून निवडून आलेल्या आणि बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या शेख मुजीबूर रहमान यांची कन्या शेख हसीना यांच्याविरुद्ध काही अतिरेक्यांनी अतिरेक करून बांगलादेशात असंतोष पेटविलेला आहे. अखेर शेवटच्या घटकेला शेख हसीना यांना बांगलादेशातून पलायन करावे लागले. त्या पलायनाला एक तास जरी उशीर झाला असता. तरी जातीयवादी आक्रमक अतिरेक्यांनी त्यांची हत्याच केली असती. त्यांचे विमान आधी भारतात उतरले. नंतर त्या इतर एखाद्या देशात आश्रय घेतील, असा कयास लावला जात होता. पण ते जमले नाही आणि त्यांना भारतातच राहावे लागले. ज्या शेख मुजीबूर रहमान यांनी पाकिस्तानच्या तावडीतून बांगलादेश मुक्त केला. त्यांच्याच स्मृती आता नष्ट केल्या गेल्या. बंगाली अतिरेकी आणि त्यांना फूस देणारे पाकिस्तानी लष्करवाले यांनी बांगलादेशचा सत्यानाश करण्याचे ठरविलेले दिसते. बलुचिस्तानात पाकिस्तान विरुद्ध प्रचंड आक्रोश आहे. भारताची फाळणी झाली तेव्हा बलुचिस्तान स्वतंत्र ठेवण्यात येईल, असा तेथील बादशहाचा इरादा होता. पण पाकी लष्कराने बळजबरीने बलुचिस्तानला स्वतंत्रता मिळू दिली नाही. आज पाकिस्तानातील 43% भूभाग बलुचिस्तानमध्ये आहे. त्याची लोकसंख्या तीन कोटी पेक्षाही कमी आहे. हा प्रदेश खनिज संपत्तीने समृद्ध असल्यामुळे पाकिस्तानला कसेही करून बलुचिस्तानला आपल्यापासून दूर करायचे नाही. पाकिस्तानात सिंधी, पश्तूनी, मुजाहिद वगैरे सारख्या मुस्लिम जमाती आहेत. मात्र पाकिस्तानी लष्कराला हे दादागिरी करण्याचे ठिकाण आहे, असे वाटते. पंजाबी मुस्लिमांनी बलुचिस्तानला स्वातंत्र्यलढा लढण्यास प्रवृत्त केले आहे. पण तो भूभाग पाकिस्तानला लागून असल्यामुळे पाकच्या लष्करासमोर बलुच योद्धे टिकू शकत नाहीत. 1971 साली सर्वाधिक लोकसभेच्या जागा जिंकूनही शेख मुजीबुर रहमान यांना आताच्या पाकड्यांनी सत्तेवर बसू दिले नाही. त्यांच्या आवामी लीग या पक्षाचे बहुमत असताना सुद्धा त्यावेळी झुल्फिकार अली भूत्तो यांनी प्रचंड विरोध केला आणि ते सत्तेवर आले. त्यानंतर नेहमीप्रमाणे लष्करी उठाव होऊन भुत्तो यांना फासावर लटकावे लागले. त्यानंतर त्यांच्या कन्येलाही अपघातात मरण्यात आले. पण आता हे पाकडे बांगलादेशचे वाकडे करण्यासाठी त्यांच्या सवयीप्रमाणे येथील अतिरेक्यांना मदत करीत आहेत. ही मदत आर्थिक नाही, त्या स्वरूपाची मदत करण्याएवजी कुवत पाकिस्तानामध्ये नाही. पण इस्लामच्या नावावर अनेक अतिरेक्यांनी शेख हसीनाची सत्ता उलथवून टाकण्यासाठी फार मोठा प्रयत्न केला आणि तो यशस्वी ठरला. त्यावेळी घाईघाईत एका बँकेचे अध्यक्ष असलेल्या आणि शेख हसीना यांचे कट्टर विरोधक असलेल्या मोहम्मद युनूस यांना तात्पुरते सत्तेवर बसविले गेले. अजूनही त्या ठिकाणी निवडणूक घेण्याची कोणतीही हालचाल दिसत नाही. आवामी लीगच्या अनेक नेत्यांना कोणतेही कारण नसताना अतोनात त्रास देण्यात येत आहे. आवामी लीग निवडणूक लढवूच नये. अशी पावलेही उचलण्यात येत आहेत. शेख हसीना भारताशी चांगले संबंध ठेवून बांगलादेशच्या विकासासाठी तत्पर होत्या. त्यांच्या कार्यकाळात बांगलादेशची बरीच प्रगती झाली. पण अमेरिकेलाही शेख हसीना त्यांचा अलिप्तपणा पचला नाही. त्यामुळे पाकिस्तानचे भावनात्मक आवाहन आणि अमेरिकेचा पैसा यामुळे बांगलादेशचे लोकनियुक्त सरकार पाडले गेले आणि शेख हसीना यांना देश सोडावा लागला. मोहम्मद युनूस यांनी राज्यकारभार हाती घेतला. पण त्यांच्या कार्यकाळात त्या देशातील हिंदूंवर हल्ले होऊ लागले. त्याला आवर घालणे त्यांना जमले नाही. आता बांगलादेशात अशी काही अवस्था निर्माण झालेली आहे की, कोणाचा पायपोस कोणाच्या हातात नाही. भारताशी सहकार्य केल्याशिवाय बांगलादेशाची अर्थव्यवस्था चालू शकत नाही. पण मोहम्मद युनूस सारख्या केवळ अर्थतज्ज्ञ वानराच्या हातात मोत्याची माळ दिल्यामुळे हा माणूस त्या माळेचे मणी चावून चावून फोडून फेकून देत आहे. अशा स्थितीत पाकिस्तान मित्र अतिरेक्यांना आणि अनेक वाह्यात तरुणांना मोकळे मैदान मिळालेले आहे. आता बांगलादेशात पुन्हा लष्कराची सत्ता येते की काय, हाच एक प्रश्न शांततावादी जनतेच्या मनात रेंगाळत आहे.

अल्लाह बांगलादेशचे रक्षण करो!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# गोरे प्रकरणातील आरोपी महिलेशी सुप्रिया सुळेंचा थेट संपर्क
## मुख्यमंत्री फडणवीसांचा विधानसभेत गंभीर दावा

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर एका महिलेनं आरोप करत त्यांच्याकडून खंडणी उकळण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी सदर महिलेला सापळा रचून अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पोलिसांकडून सखोल तपास चालू असतानाच यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत खळबळजनक आरोप केला आहे. आरोपी महिला व तिच्यासोबतचे सहकारी थेट राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या संपर्कात असल्याचं फडणवीसांनी म्हटलं आहे. यावरून आता राजकीय दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत.

जयकुमार गोरे यांच्यावर झालेले आरोप आणि त्यानंतर संबंधित महिलेला करण्यात आलेली अटक याबाबत देवेंद्र फडणवीसांनी विधानसभेत निवेदन सादर केलं. "एखाद्याला आयुष्यातून उठवायच्या हेतूने राजकारण होत असेल तर ते योग्य नाही. गोरेंसंदर्भातली केस २०१६ मध्ये नोंद झाली, २०१९ ला संपली. ते तेव्हा सत्तापक्षातही नव्हते. पण त्यानंतर अचानक हे उकरून काढण्याचा प्रकार झाला", असं फडणवीस म्हणाले.

"मी त्यांच्या हिंमतीची दाद देतो. एखादी व्यक्ती अशा स्थितीत गोष्टी



मिटवण्याचा प्रयत्न करते. पण त्यांनी लाचेची मागणी झाल्यानंतर तक्रार केली. त्यानंतर सापळा रचला. सगळं संभाषण रेकॉर्ड झालं. संभाषणाच्या अनेक क्लिप आहेत. पोलीस विभागाची खात्री पटल्यानंतर त्यांनी सापळा रचला. प्रत्यक्ष रोख रक्कम घेताना



आरोपीला पकडण्यात आलं. त्यामुळे हा ब्लॅकमेलिंगचाच प्रकार होता", असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं.

दरम्यान, देवेंद्र फडणवीसांनी या प्रकरणात एक नेक्सस काम करत होतं असा उल्लेख केला आहे. "हे एक प्रकारचं नेक्सस होतं. या प्रकरणातील तिघा आरोपींना अटक झाली आहे. एक स्वत: ती महिला आहे. दुसरा हा पत्रकार तुषार खरात आहे आणि तिसरा अनिल सुभेदार नावाचा व्यक्ती आहे. या सगळ्यांनी मिळून हा कट रचला होता. याचे सगळे पुरावे सापडले आहेत. यांचं व्हॉट्सॲप संभाषण सापडलं आहे. यांचे १५० फोन सापडले आहेत. यांनी कट कसा रचला हे समोर आलं आहे. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे यात थेट या सगळ्यांशी पूर्णपणे संपर्कात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे लोक दिसतात", असा दावा देवेंद्र फडणवीसांनी केला.

"प्रभाकर देशमुख यात थेट १०० वेळा या तिन्ही आरोपींशी बोलले आहेत. व्हिडीओ त्यांच्याकडे गेले आहेत. त्यांचंही उत्तर आलं आहे. पण त्याहीपेक्षा मला वाईट वाटतं ते म्हणजे सुप्रिया सुळे आणि रोहित पवार यांचे कॉल्स तुषार खरात यांना झाले आहेत याचं. जयकुमार गोरेंचे जे व्हिडीओ झालेत, ते आरोपींनी या दोघांना पाठवले आहेत. आता याची चौकशी होईल. पण हे चाललंय काय? आपण राजकीय शत्रू नाही आहोत, आपण राजकीय विरोधक आहोत. अशा प्रकारे कुणाला जीवनातूनच उठवण्याचा कट रचला जात असेल तर हे चुकीचं आहे", असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

# आदित्य ठाकरेंचा ड्रग्जच्या व्यापारात सहभाग
## दिशा सालियन प्रकरणात वकील निलेश ओझांचा गंभीर आरोप

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

दिशा सालियन मृत्यू प्रकरण पाच वर्षानंतर आता पुन्हा चर्चेत आलं आहे. दिशा सालियनच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका काही दिवसांपूर्वी दाखल केल्याची माहिती समोर आली आणि त्यानंतर हे प्रकरण पुन्हा चर्चेत आलं. दिशा सालियनची आत्महत्या नाही तर हत्या करण्यात आल्याचा आरोप दिशा सालियनच्या वडिलांनी केला आहे. दरम्यान, यानंतर आज दिशा सालियनचे वडील सतीश सालियन आणि त्यांचे वकील निलेश ओझा यांनी मुंबईचे गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त लखमी गौतम यांची भेट घेतली.

दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेऊन त्यांनी लेखी तक्रार केली आहे. या प्रकरणातील आरोपींवर गुन्हा दाखल करून तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, सतीश सालियन आणि वकील निलेश ओझा यांनी ही तक्रार केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी वकील निलेश ओझा यांनी आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. 'आदित्य ठाकरे यांचा ड्रग्जच्या व्यापारात सहभाग असल्याचा





आरोप करत उद्धव ठाकरे हे देखील दिशा सालियन प्रकरणात आरोपी असल्याचा गंभीर आरोप वकील निलेश ओझा यांनी केला आहे.

"आम्ही याआधीही म्हटलं होतं की जेव्हा एखाद्या प्रकरणात एखाद्या पोलीस अधिकाऱ्याचा समावेश असतो, तेव्हा अशा प्रकारे तक्रार द्यावी लागते. आम्ही आज मुंबईचे गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त लखमी गौतम यांच्याकडे तक्रार दिली आहे. आता आमच्याकडून सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आम्ही केलेली तक्रारच एफआयआर आहे. आता पुढची जबाबदारी पोलिसांची आहे. आता पोलीस आरोपींवर कधी कारवाई करतात हे पाहावं लागेल", असं वकील निलेश ओझा यांनी म्हटलं आहे.

"आम्ही जी तक्रार दिली तिच एफआयआर आहे. यामध्ये आदित्य ठाकरे, दिनो मोरया, सूरज पांचोली, तसेच त्यांचे सुरक्षा रक्षक, परमबीर सिंह, सचिन वाझे, रिया चक्रावर्ती हे सर्व लोक आमच्या तक्रारीनुसार आरोपी आहेत. या प्रकरणात जेव्हा आदित्य ठाकरे यांचं नाव आलं, तेव्हा परमबीर सिंह यांनी पत्रकार परिषद घेतली आणि अशी स्टोरी सांगितली की आम्ही सीसीटीव्ही फुटेज चेक केले आहेत. यामध्ये कोणताही राजकीय नेता त्या ठिकाणी आलेला नव्हता असं परमबीर सिंह यांनी पत्रकार परिषद सांगितलं होतं, म्हणजे परमबीर सिंह यांनी आदित्य ठाकरेंना वाचवण्याचा प्रयत्न केला", असा आरोप निलेश ओझा यांनी केला.

दरम्यान, वकील निलेश ओझा यांनी माध्यमांशी बोलताना आमदार आदित्य ठाकरेंवर गंभीर आरोप केले आहेत. आदित्य ठाकरे यांचा ड्रग्सच्या व्यापारात सहभाग असल्याचा आरोप निलेश ओझा यांनी केला आहे. तसेच डिनो मोरिया आणि आदित्य ठाकरे यांचं संभाषण झाल्याचा दावा ओझा यांनी केला आहे.

"तसेच आम्हाला फक्त दोन गोष्टी सिद्ध करायच्या आहेत की दिशा सालियान प्रकरण जेव्हा घडलं तेव्हा त्या ठिकाणी आदित्य ठाकरे हे तिथे होते की नव्हते? दिशा सालियानचा मृत्यू हा नैसर्गिक नाही. त्यामध्ये अनेक संशयास्पद कारणं असल्याचं दिसत आहेत. तसेच आदित्य ठाकरे यांनी याबाबत दिलेले स्पष्टीकरण हे खोटे आहे. आमच्याकडे काही प्रत्यक्षदर्शी देखील आहेत. आम्ही फक्त आता नावे सांगत नाहीत", असं निलेश ओझा यांनी म्हटलं आहे.

दिशा सालियन मृत्यू प्रकरणात वकील निलेश ओझा यांनी आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. "या प्रकरणात उद्धव ठाकरे देखील आरोपी आहेत", असा आरोप वकील निलेश ओझा यांनी केला. उद्धव ठाकरे यांनी हे प्रकरण दाबण्यासाठी सत्तेचा गैरवापर केला म्हणून ते देखील आरोपी आहेत, असंही ओझा म्हणाले.

# कुणाल कामराचा माफी मागण्यास नकार

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

प्रसिद्ध स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची थट्टा करणारं एक गाणं सादर केलं आहे. या गाण्याचा व्हिडीओ देखील त्याने समाजमाध्यमांवर शेअर केला आहे. या गाण्यामुळे दोन दिवसांपासून बराच वाद चालू आहे. कुणाल कामरा याने ज्या ठिकाणी ते गाणं म्हटलं आणि शो केला त्या हॉटेलची, तिथल्या 'दी हॅबिटॅट' या स्टुडिओची शिवसेना (शिंदे) कार्यकर्त्यांनी तोडफोड केली आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यासह अनेकांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. कुणाल कामराचं वर्तन योग्य नाही असं फडणवीस म्हणाले.



दरम्यान, या सगळ्या प्रकारानंतर कुणाल कामरा याने देखील प्रतिक्रिया दिली आहे. 'माय स्टेटमेंट' असं कॅप्शन देत त्याने एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये कुणाल कामराने म्हटलं आहे की "ज्या ठिकाणी माझा शो आयोजित करण्यात आला होता, ती अशा प्रकारच्या शोचीच जागा आहे. हॅबिटॅट हे ठिकाण आणि तो स्टुडिओ, तिथे जे काही घडलं त्यासाठी जबाबदार नाही. या ठिकाणी तोडफोड करण्यात आली. त्या ठिकाणी अपशब्दही वापरले गेले. लॉरी भरुन टॉमेटो आणले गेले असं मी एकलं कारण आम्ही जे बटर चिकन तुम्हाला वाढलं ते तुम्हाला आवडलं नाही."

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रसारमाध्यमांसमोर म्हणाले होते की कुणाल कामरा याने एकनाथ शिंदे यांची माफी मागायला हवी. त्यावर कुणाल म्हणाला, मी एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची माफी मागणार नाही. मी कोणालाही घाबरत नाही. मी माझ्या पलंगाखाली लपून बसलेलो नाही.

कुणालने ज्या ठिकाणी त्याचा कार्यक्रम घेतला होता ती जागा एकनाथ शिंदे समर्थकांनी उद्ध्वस्त केली आहे. त्यामुळे आता कुणालने त्याच्या पुढच्या कार्यक्रमासाठी नवी जागा निवडली आहे. तो म्हणाला, "माझ्या पुढच्या कार्यक्रमाचं ठिकाण असं असेल जे पाडण्याची अधिक गरज आहे. मी एल्फिन्स्टन ब्रिज (प्रभादेवी) किंवा मुंबईतील अशा इमारतीची निवड करेन जी पाडण्याची गरज आहे." कुणालने त्याच्या गंमतीदार शैलीत (उपहासाने) असं म्हटलं आहे.

# प्रशांत कोरटकरला 3 दिवसांची पोलीस कोठडी

**कोल्हापूर, दि. २५ प्रतिनिधी**

इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयी अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी फरार असलेल्या प्रशांत कोरटकर याला सोमवारी (दि.२४) तेलंगणातून अटक केली होती. कोल्हापूर पोलिसांनी त्याला आज न्यायालयात हजर केले असता ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.



दरम्यान, इंद्रजीत सावंत यांचे वकील असीम सरोदे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, कोरटकर यांने पोलीस तपासात मदत केली नाही. सावंत यांना फोनवरून धमकी दिलेला आवाज माझा नाही, असा दावा कोरटकरने न्यायालयात केला आहे. त्यामुळे त्याच्या आवाजाचे नमुने घेणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आम्ही ७ दिवसांची पोलीस कोठडी मागितली. कोरटकर चंद्रपूर पोलिस मुख्यालयाच्या समोर राहत होता. पोलिसांच्या जवळ राहून तो फरार असेल, तर याची चौकशी केली पाहिजे. आमची लढाई कोरटकर सारख्या प्रवृत्तीविरोधात आहे. इतर लोकांनी कोरटकरला मदत केली, याची चौकशी केली पाहिजे.

दरम्यान, कोरटकरने कोल्हापूर न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. त्याचा जामीन अर्ज मंजूर झाल्याने ११ मार्चपर्यंत त्याला दिलासा मिळाला होता. पण, कोल्हापुरातील सामाजिक संघटनांच्या दबावानंतर पोलिसांनी कोरटकर याचा अटकपूर्व जामीन रद्द करण्याची मागणी केली होती. त्यानुसार न्यायालयाने त्याचा अटकपूर्व जामीन रद्द केला होता. त्यानंतर आणि त्यापुर्वीही कोल्हापूर पोलिसांनी नागपूरला धाव घेत कोरटकर याचा शोध सुरू केला होता. तथापि, त्याने सुरुवातीला मध्य प्रदेशात पळ काढल्याची चर्चा होती.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच कोरटकर याने सुरुवातीला पश्चिम बंगाल आणि त्यानंतर दुबईत पळ काढल्याची चर्चा होती. तथापि, त्यानंतर त्याच्या पत्नीनेच त्याचा पासपोर्ट जमा केल्यानंतर कोरटकर देशाबाहेर गेला नसल्याचे स्पष्ट झाले होते.

## कुणाल कामराचे नवे गाणे

कुणाल कामराने पुन्हा एका शिंदेंच्या शिवसैनिकांना डिवचले आहे. कामराने आणखी एक गाण्याचा व्हिडीओ पोस्ट करुन क्लबमधल्या तोडफोडीवर भाष्य केलं आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील वादग्रस्त गाण्यावरुन राज्यभरात कुणाल कामराविरोधात आंदोलन करण्यात आलं. कुणाल कामरावर कठोर कारवाई करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी खार येथील युनीकॉन्टिनेंटल हॉटेलमधील द हॅबिटॅट क्लबची तोडफोड देखील केली. त्यानंतर आता या तोडफोडीवरुन कुणाल कामराने नवं गाणं पोस्ट केलं आहे. या गाण्यामधून त्यांने शिंदे गटाच्या शिवसैनिकांना लक्ष्य केलं आहे.

भारताचे आणखी एक राष्ट्रगीत म्हणत कुणालने हे गाणं गायलं. "हम होंगे कंगाल एक दिन, मन में है अंधविश्वास, देश का सत्यानाश. होंने नगे चारों ओर, करेंगे दंगे चारों ओर पुलिस के पंगे चारों ओर. एक दिन मन में नथूराम, हरकतें आसाराम. हम होंगे कंगाल एक दिन," असे गाणे कुणाल कामराने गायले.

# ईदचे औचित्य साधत भाजपा ३२ लाख मुस्लीम कुटुंबाला देणार 'सौगात ए मोदी'

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

ईदच्या निमित्ताने भाजपामुस्लीम समाजाला विशेष गिफ्ट देणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपा अल्पसंख्याक मोर्चा देशातील ३२ लाख गरीब मुसलमानांना ईदसाठी 'सौगात ए मोदी' किट देणार आहे. जेणेकरून ईद साजरी करण्यासाठी त्यांना कुठलीही अडचण होऊ नये. ईदसाठी हे गिफ्ट गरजू मुस्लिमांसाठी वाटप केले जाईल. अल्पसंख्याक मोर्चाचे ३२ हजार पदाधिकारी देशातील ३ हजार मशिदींमध्ये जाणार आहेत. त्याठिकाणी ३२ लाख गरजू मुस्लीम व्यक्तींना मदत केली जाणार आहे.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या मार्गदर्शनात मंगळवारी दिल्लीच्या निजामुद्दीन इथून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. गरीब मुस्लीम कुटुंबाला ईद साजरी करण्यासाठी बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. या अभियानातंर्गत भाजपा गरजवंत मुस्लीम



समाजापर्यंत पोहचणार आहे. रमजानच्या पवित्र महिन्यात गरीब, गरजू शेजारी यांना मदत करण्यावर भाजपाने जोर दिला आहे. अल्पसंख्याक मोर्चा गुड फ्रायडे, ईस्टर, भारतीय नववर्षात सहभाग घेत सौगात ए मोदी किट वितरीत करेल. त्यामुळे सांप्रदायिक सलोखा वाढवण्यास मदत होईल असं भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी यांनी सांगितले.

भाजपाने 'सौगात ए मोदी' अभियानाची घोषणा केली. या किटमध्ये खाण्या पिण्याच्या गोष्टींसोबत कपडे, शेवई, खजूर, ड्राय फ्रुट्स आणि साखर असेल. महिलांसाठी या किटमध्ये सूटचे कपडे असतील. पुरुषांसाठी किटमध्ये कुर्ता पायजमा असणार आहे. या प्रत्येक किटची किंमत ५०० ते ६०० रूपये इतकी आहे. गरीब आणि गरजू मुसलमानांना ईद साजरी करता यावी यासाठी भाजपा हा उपक्रम राबवत आहे.

दरम्यान, भाजपाकडून जिल्हास्तरावर ईद मिलनाचा कार्यक्रम आयोजित केला जाईल. सौगात ए मोदी अभियानात भाजपाकडून मुस्लीम समुदायाला आकर्षित करत त्यांच्यासाठी कल्याणकारी योजनांची माहिती देणे, भाजपा आणि एनडीएसाठी त्यांचा पाठिंबा वाढवणे यावर भर दिला जाणार आहे. मुस्लीम समुदायातील काही शिक्षित युवा, महिलांनी लोकसभेला मोदींना मतदान केले होते. मुस्लिमांचे मतांसाठी राजकारण करणाऱ्या पक्षांवर त्यांचा विश्वास नाही असं भाजपा प्रवक्ते नीरज कुमार यांनी म्हटलं.

# देशावर ७११.८ अब्ज डॉलर्सचे विदेशी कर्ज

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

भारतात गेल्या १० वर्षात विदेशी कर्ज २५० अब्ज डॉलर्सनं वाढलं आहे. लोकसभेत विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाचं उत्तर देताना केंद्रीय वित्त मंत्रालयामार्फत हे उत्तर देण्यात आलं आहे. वित्त मंत्रालयाला एक प्रश्न विचारण्यात आला होता की ३१ मार्च २०१४ रोजी भारतावर विदेशी कर्ज किती होतं? आणि ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत कर्ज किती वाढलं आहे.

अर्थमंत्रालयानं मात्र सप्टेंबर २०२४ पर्यंतची आकडेवारी मांडली आहे. त्यानुसार देशावर ७११.८ अब्ज अमेरिकन डॉलर्सचं विदेशी कर्ज आहे. तर, मार्च २०१४ मध्ये ४४६.२ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकं विदेशी कर्ज होतं. म्हणजेच गेल्या १० वर्षात भारतावरील विदेशी कर्ज २६५ अब्ज डॉलर्सनं वाढले आहे.

वित्त मंत्रालयानं या उत्तरासोबत आणखी माहिती दिली. भारताने २०१३-१४ मध्ये विदेशी कर्जावर व्याज ११.२० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकं दिलं होतं. तर, २०२३-२४ मध्ये अंदाजे २७.१० अब्ज डॉलर्स इतकं व्याज दिलं आहे.

कॉंग्रेस, टीएमसी, समाजवादी पार्टी आणि इतर विरोधी पक्षांनी सातत्यानं विदेशी कर्जाच्या मुद्यावरुन सरकारवर हल्लाबोल केला आहे. विरोधी पक्षांच्या मते यूपीए सरकारच्या काळात जितकं विदेशी कर्ज भारतावर होतं त्यात एनडीए सरकार आल्यानंतर ५० टक्के वाढ झाली आहे. गेल्या १० वर्षांच्या काळात ही वाढ झाली आहे.

मोदी सरकारकडून सातत्यानं विदेशातून कर्ज घेतलं जात आहे. त्यामुळं देशातील प्रत्येक नागरिकांवर हजारो रुपयांचं कर्ज वाढत आहे. विरोधी पक्षांनी या मुद्यांवरुन सरकारवर हल्लाबोल केला आहे.

# अण्णा बनसोडे विधानसभा उपाध्यक्ष

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

अजित पवारांच्याराष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे हे विधानसभेचे उपाध्यक्ष बनले आहेत. या पदासाठी एकच अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यामुळे अण्णा बनसोडे यांची बिनविरोध निवड झाली असून, याची अधिकृत घोषणा विधानसभा अध्यक्षांकडून २६ मार्च रोजी केली जाणार आहे. तीन वेळा आमदार म्हणून निवडून आल्यानंतर अण्णा बनसोडेंचं मंत्रिपदाची अपेक्षा होती. पण, त्यांना डावलण्यात आलं. त्यामुळे बनसोडे नाराज झाले होते. आता अजित पवारांकडून मंत्रिपदाचा दर्जा असलेलं पद देऊन ती नाराजी दूर केल्याचे बोलले जात आहे.

पिंपरी चिंचवड या राखीव असलेल्या मतदारसंघाचे अण्णा बनसोडे हे आमदार आहेत. २०१४ मध्ये झालेला पराभव वगळता ते तीन वेळा निवडून आले आहेत. २०२४ मध्ये महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर अण्णा बनसोडे यांना मंत्रिपदासाठी इच्छुक होते. पण, त्यांना संधी मिळाली नाही, त्यामुळे



नाराज झाले होते. आता विधानसभा उपाध्यक्षपदासाठी दोन-तीन नावे स्पर्धेत होती. अखेर अण्णा बनसोडे हे उपाध्यक्ष बनले आहेत.

अण्णा बनसोडे यांचा राजकीय प्रवास महापालिकेच्या निवडणुकीपासून सुरू झाला. राजकारणात येण्यापूर्वी ते पान टपरी चालवायचे. हा व्यवसाय करत असताना ते राजकारणात सक्रीय झाले आणि १९९७ मध्ये त्यांनी पहिल्यांदा महापालिकेची निवडणूक लढवली आणि नगरसेवक बनले. २००२ मध्ये पुन्हा ते नगरसेवक बनले. याच काळात त्यांनी स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणूनही काम केले.

याच काळात ते अजित पवारांच्या संपर्कात आले आणि आता ते निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. ज्या ठिकाणी त्यांची पूर्वी पान टपरी होती, त्याच जागेवर आता त्यांचं जनसंपर्क कार्यालय आहे. २००९ मध्ये त्यांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि जिंकले. मात्र, २०१४ मध्ये त्यांचा पराभव झाला.

# औरंगजेबाने शंभूराजेंना मनुस्मृतीप्रमाणे मारले
## हुसेन दलवाई यांचा खळबळजनक दावा

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

छावा चित्रपटामुळे छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रमाचा पुन्हा गौरव होत आहे. तर, दुसरीकडे औरंगजेबचा क्रूर इतिहास पुन्हा चर्चेत आला आहे. औरंगजेबच्या कबरीवरुन महाराष्ट्रात वाद पेटला आहे. नागपूरात हिंसाचाराचा प्रकार घडला. नागपूर हिंसाचार प्रकरणी परिस्थितीची पाहणी करायला आलेले कॉंग्रेस नेते हुसेन दलवाई यांनी वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. औरंगजेबाने शंभूराजेंना मनुस्मृतीप्रमाणे मारलं असा खळबळजनक दावा कॉंग्रेस नेते हुसेन दलवाई यांनी केला आहे. औरंगजेबाने शंभूराजेंना मनुस्मृतीप्रमाणे मारले असे वादग्रस्त वक्तव्य दलवाई यांनी केले आहे. 'मारण्याची पद्धत पंडितांनी औरंगजेबाला सांगितली असं म्हणत इतिहासातील वस्तूस्थिती दुर्लक्षित करता येणार नाही असंही दलवाई म्हणाले. हुसेन दलवाई यांनी केलेल्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जरा औरंगजेबाचाही इतिहासही वाचावा. औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांची हत्या केली ती क्रुरता होती. ही बाब देवेंद्र फडणवीस मान्य करतील का? असा सवालही हुसेन दलवाई यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रात अशा पद्धतीचे वातावरण कधीही नव्हते. महाराष्ट्रात नेहमीच सर्व धर्मांचे एकोप्याचे नातं राहिलेले आहे. अनेक सणांमध्ये हिंदू मुस्लिम एकत्र येतात. सरकारने जाणीवपूर्वक काही लोकांना मदत करते. मला वाटते ते चुकीचं आहे. सकाळी ज्यांनी आंदोलन केले त्यांना काहीच नाही ज्यांनी रात्री आंदोलन केले त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला असा आरोप हुसेन दलावई यांनी केला. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलास आंदोलनाची परवानगी द्यायला नको होती. पोलिसांची कारवाई एकतर्फी होती. झालेली घटना दुर्दैवी होती. पोलिसांनी संयम बाळगायला हवा होता असंही हुसेन दलवाई म्हणाले.

# दंतेवाडा चकमकीत मुरलीसह 3 नक्षलवाद्यांचा एन्काऊंटर

**दंतेवाडा, दि. २५ वृत्तसंस्था**

छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त जिल्ह्याच्या दंतेवाडामध्ये मंगळवारी सकाळी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलाला मोठं यश मिळालं आहे. दंतेवाडा-विजापूर-नारायणपूर जिल्ह्याच्या सीमेवर सुरक्षा दलांनी कुख्यात माओवादी सुधीर उर्फ मुरली याच्यासह तीन नक्षलवाद्यांचा खात्मा केला. झेराम हल्ल्याचा मास्टरमाइंड असलेल्या चैतूचाही चकमकीत मृत्यू झाल्याचे म्हटलं जात आहे. सुरक्षा दलांनी तीन मृतदेहांसह इन्सास रायफल ३०३ रायफल, १२ बोअरची बंदूक, स्फोटक साहित्य आणि दैनंदिन वापरातील इतर वस्तू ताब्यात घेतल्या आहेत.

दंतेवाडा जिल्ह्यात मंगळवारी सुरक्षा दलांनी केलेल्या चकमकीत तीन नक्षलवाद्यांना ठार झाले. दंतेवाडा आणि विजापूरच्या सीमावर्ती भागात झालेल्या चकमकीत २५ लाखांचे बक्षीस असलेला नक्षलवादी सुधीर उर्फ सुधाकर उर्फ मुरली मारला गेला. मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांमध्ये टॉप कमांडर मुरलीचाही समावेश असल्याचे सांगितले. मुरली उर्फ सुधीर दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीचा सदस्य होता.

सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये सकाळी ८ वाजता चकमक सुरू झाली. दोन्ही बाजूंकडून बराच वेळ गोळीबार सुरू होता. अनेक तासांच्या गोळीबारानंतर सुरक्षा दलांनी जंगलात शोधमोहीम सुरू केली तेव्हा तीन पुरुष नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले. त्यांच्याकडून विविध शस्त्रे देखील जप्त करण्यात आली. या कारवाईच्या एक दिवस आधीच ५०० जवान असलेले सुरक्षा दल जंगलात शोधमोहिमेवर पाठवण्यात आलं होतं. त्यानंतर या चकमकीची माहिती पुढे आली आहे.

दरम्यान, या कारवाईत नक्षलवादी चैतू उर्फ श्यामही ठार झाल्याचे म्हटलं जात आहे. नक्षलवादी चैतू हा झेराम हल्ल्याचा सूत्रधार होता. गिरी रेड्डी असे नक्षलवादी चैतू उर्फ श्यामचे नाव आहे. तो चैतू उर्फ श्याम दादा या नावाने ओळखला जायचा. नक्षलवादी चैतू हा आंध्र प्रदेशचा रहिवासी आहे. छत्तीसगडमधील नक्षल संघटनेत अनेक वर्षांपासून सक्रियपणे काम करत होता.

देशातील सर्वात मोठा नक्षलवादी हल्ल्याचा तो मास्टरमाईंड होता. २५ मे २०१३ रोजी नक्षलवाद्यांनी दर्भा येथील झेरामवर हल्ला केला होता. या हल्ल्यात छत्तीगडमधील दिग्गज कॉंग्रेस नेते महेंद्र कर्मा, नंदकुमार पटेल यांच्यासह ३० जण मारले गेले होते.

## महत्त्वाचे

### जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराजांचे शिवपुरी आश्रमात स्वागत

**ओझर ।** जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज यांना प्रयागराज येथील कुंभमेळ्यात जगदगुरु उपाधी प्राप्त झाल्यानंतर त्यांचे राज्यभर ठिकठिकाणी जोरदार स्वागत व पूजन संपन्न होत



आहे. वैजापूर तालुक्यातील शिवपुरी येथील आश्रमाच्यावतीने जगदगुरूंचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी विविध वास्तूंचे पूजन, सत्संग आदी भरगच्च कार्यक्रम संपन्न झाले. जगदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांनी स्थापन केलेल्या वैजापूर तालुक्यातील शिवपुरी आश्रम येथे उत्तराधिकारी शांतीगिरीजी महाराज यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. श्रीक्षेत्र शिवपुरी आश्रमाच्या पुण्यपावन भुमित श्री. १०८ महंत स्वामी सेवागिरीजी महाराज व पंचक्रोशीतील जय बाबाजी भक्त परिवार यांच्यावतीने भव्य स्वागत व पुजन सोहळा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी ओम जगदगुरु जनार्दन स्वामी संस्कार भवन, श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर प्रवेशद्धार, जलकुंभ व भंडारगृह वास्तु पुजन सोहळा व सत्संग संपन्न झाला.यावेळी जगदगुरु शांतीगिरीजी महाराज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून सदगुरूंच्या कार्याचा महिमा सांगितला. श्री १०८ महंत स्वामी सेवागिरीजी महाराज, विवेकानंद महाराज यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी कैवल्यानंदगिरीजी महाराज, महादेवानंदगिरीजी महाराज, श्रीपादानंद महाराज, गणेशानंद महाराज, गोपालानंद महाराज यांसह आश्रमीय संत व भाविक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

### भूमी अभिलेख कार्यालयात दर सोमवारी सैनिकांच्या समस्यांचे निराकरण

**नाशिक ।** भारतीय सैन्य दलातील कार्यरत, निवृत्त सैनिक व त्यांचे कुटुंबिय यांचे भूमी अभिलेख कार्यालयाशी संबंधित सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रत्येक आठवड्यातील सोमवार (संपूर्ण कार्यालयीन कामकाजाची वेळ) राखून ठेवण्यात आला आहे. नाशिक विभागांतर्गत सर्व जिल्ह्यातील कार्यरत, निवृत्त सैनिक व त्यांचे कुटुंबीयांनी आपल्या अडचणींचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन नाशिक प्रदेश, नाशिक उपसंचालक भूमी अभिलेख, महेश इंगळे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. उपसंचालक भूमी अभिलेख, नाशिक प्रदेश नाशिक कार्यालयाच्या अधिनस्त नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांत जिल्हा कार्यालये असून त्यांच्या अधिनस्त 64 तालुकास्तरीय भूमी अभिलेख कार्यालय कार्यरत आहेत. या कार्यालयांमार्फत जमीन मोजणी, मिळकतींचे फेरफार, जमीन संदर्भातील आवश्यक नकाशे, नकला, भूमापन इत्यादी कामे करण्यात येतात. राज्यातील अनेक ग्रामीण व शहरी भागातील सेवा बजावत असलेल्या सैनिकांना सेवाकाळात कमी प्रमाणात रजा मिळत असल्याने त्यांना त्यांच्या स्थावर मिळकतींशी निगडित समस्यांकडे पाठपुरावा करण्यासाठी पुरेसा अवधी मिळावा, यासाठी प्रत्येक आठवड्यातील सोमवार राखून ठेवण्यात आला असल्याचे उपसंचालक इंगळे यांनी कळविले आहे.

### उत्कृष्ट सांघिक कामगिरीने प्रेसिडेंट ११ वरील विजयासह नाशिक गटविजेते

**नाशिक ।** पुणे येथे झालेल्या महाराष्ट्रव क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय, वरिष्ठ महिला आमंत्रितांच्या अव्वल साखळी क्रिकेट (इन्व्हिटेशन सुपर लीग) स्पर्धेत, नाशिक जिल्हा महिला संघाने सांगली व डी.व्ही.सी.ए. क्लब, पुणे, पाठोपाठ प्रेसिडेंट ११ वर देखील उत्तम सांघिक कामगिरीने अतिशय चुरशीच्या लढतीत २ गडी राखून विजय मिळवत सुपर लीगमधल्या ब गटात देखील लागोपाठ तीन विजयांसह अपराजित राहून लीग फेरी प्रमाणेच इथेही गटविजेतेपद मिळवत ४ संघांत पहिले स्थान मिळवले. गोलंदाजीत रसिका शिंदे व पूजा वाघने प्रत्येकी २ बळी घेतले. तर फलंदाजीत तेजस्विनी बाटवाल, शाल्मली क्षत्रिय, कार्तिकी गायकवाड, प्रियांका घोडके व अनुष्का सोनवणे यांनी विशेष चमक दाखवली. प्रेसिडेंट ११ ने प्रथम फलंदाजी करत सर्व बाद १७० धावा केल्या. त्यात साक्षी वाघमोडेने सर्वाधिक ६५ धावा केल्या. गोलंदाजीत नाशिकतर्फे मध्यमगती रसिका शिंदे व ऑफ स्पिनर पूजा वाघने प्रत्येकी २ तर लक्ष्मी यादव व ऐश्वर्या वाघने प्रत्येकी १ बळी घेतला. विजयासाठी १७१ धावांचा पाठलाग करणाऱ्या नाशिकच्या फलंदाजांनी ४३ व्या षटकांत लक्ष्य पार केले. यात तेजस्विनी बाटवाल ३४, शाल्मली क्षत्रिय ३३, कार्तिकी गायकवाड ३१ , प्रियांका घोडके २७ व दहाव्या क्रमांकावरील अनुष्का सोनवणेच्या महत्वपूर्ण नाबाद १४ धावा अशी अतिशय सुरेख सांघिक कामगिरी करून नाशिक वरिष्ठ महिला संघास गडी राखुन विजयी केले व आपली बाद फेरीतली आगेकूच कायम ठेवली. प्रेसिडेंट ११ च्या शलाका काणे व व गौरी अहिरेने प्रत्येकी ३ बळी घेतले.

# 'रात्रं थोडी, सोंगं फार' कसा पेलणार हा 'भार'

## कुंभमेळा पर्वणीच्या तारखांपूर्वी साधू-महंतांना हव्या सुविधा



### नाशिक-त्र्यंबकेश्वरनंतर आठ महिन्यांनी उज्जेनला होणाऱ्या कुंभमेळ्याची आतापासूनच सुरुवात; इथं अजूनही नियोजन कागदावरच

**आ**गामी सन २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी जेमतेम दीड-पावणे दोन वर्षांचा कालावधी हातामध्ये आहे. या कालावधीत सिंहस्थांची खूप कामे करायची आहे. असे असताना नाशिकमध्ये मात्र अद्यापही कुंभमेळ्याचे कागदी घोडे नाचविले जात आहे. कागदावरील नियोजनाला प्रत्यक्षात सुरुवात तरी करणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. राज्य शासन, जिल्हा प्रशासन वा महापालिकेच्या कामाबद्दल इथे शंका घेतली जात नाही की त्यांच्या क्षमतेबद्दल प्रशचिन्ह उपस्थित करण्याचा प्रयत्न नाही; परंतु विलंब होतोय म्हणून कुंभमेळ्याशी संबंधित सर्वच घटक याबाबत बोलू लागले आहे, हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. म्हणूनच "रात्र थोडी सोंग फार कसा पेलणार हा भार" असे वक्तव्य केले तर त्यात चुकीचे ठरू नये.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर दौऱ्याप्रसंगी आढावा बैठक घेतली. कुंभमेळ्याच्या बाबतीत चाचपणी केली. सूचना केल्या. पाहणी केली अन घोषणाही केल्या. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टिकोनातून ते सुरु आहे, करत आहेत यात शंका नाही; परंतु हाती असलेला कालावधी आणि करावयाची सर्व तयारी याचाही विचार झाला तरच सर्व सोपस्कार यशस्वीपणे पार पडतील. कुंभमेळ्याच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे गोदावरी नदीची शुद्धता आहे. कुंभमेळ्यापूर्वी गोदावरीचे शुद्धीकरणाचा मुद्दा अधोरेखित करीत मुख्यमंत्र्यांनी तशी घोषणाही केली. त्यासाठी बाराशे कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याचे ते म्हणाले. पुढील म्हणजे एप्रिल महिन्यात गोदावरी शुद्धीकरणच्या कामाला प्रारंभ केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. या कामाची व्याप्ती खूपच मोठी आहे. खूप किचकट, अवघड कामे आहेत. त्यातच वेळ कमी आहे. म्हणूनच सारे काळजी करताहेत. गोदावरी शुद्धीकरणांतर्गत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांचे जाळे उभारायचे आहे. इतरही खूप कामे आहेत. मुख्यमंत्र्यांनी प्रयागराजच्या धर्तीवर प्राधिकरण स्थापन करण्यात येत असून,











लवकरच कायदा करण्यात येत असल्याचे सांगितले. एकंदरीत सारी तयारी जोरात सुरू असून, नियोजन केले जात असले तरी ते अजून कागदावरच असल्याने चिंता वाढत आहे.

सोमवारी (दि. २४) महापालिकेत मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी आणि शहरातील साधू-महंत, आखाडे प्रमुखांची संयुक्त बैठक झाली. या बैठकीत उपस्थित साधू-महंत-महाराजांनी सिंहस्थ कुंभमेळा पर्वणीच्या तारखांपूर्वी सहा महिने अगोदर सुविधा हव्यात, अशी मागणी केली. कुंभमेळ्याच्या कामाला विलंब होत असल्याची खंत व्यक्त करीत नाराजी व्यक्त केली. म्हणूनच विलंब आणि कागदावरील नियोजन हा मुद्दा वलयांकित झाला. सिंहस्थाची कामे करताना २०२५-२६ चा पावसाळा लक्षात घेतला तर किमान चार-सहा महिने काम थांबेल. याशिवाय इतर तांत्रिक गोष्टींमुळे होणारा विलंब वेगळा! त्यामुळे युद्धपातळीवर कामे होणे हाच एकमेव पर्याय आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वरनंतर मध्य प्रदेशातील उज्जेन येथे आठ महिन्यानंतर कुंभमेळा होणार आहे. तेथील प्रशासनाने समनवयातून आतापासून कुंभमेळ्याची कामे सुरू केली आहेत. असे असताना नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये अजूनही कुंभमेळा नियोजनाचे कागदी घोडे नाचत आहेत. महापालिकेत प्रशासक आहे. जिल्ह्याला पालकमंत्री नाही. राज्य शासन संथ गतीने सिंहस्थाची कामे करतंय. साधू-महंतांची नाराजी वाढत आहे. लोकभावनांचा विचार केला जात नाही. त्यामुळे आतापासूनच सिंहस्थ कुंभमेळा चर्चेत येऊ घातला आहे.




# देशातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे समाज व्यवस्था धोक्यात : बोरा



**नाशिक ।** आजच्या काळात सर्व क्षेत्रात अत्यंत मोठ्या प्रमाणावर लाचखोरी, गैरकारभार, भ्रष्टाचार बोकाळला असून समाज व राज्यव्यवस्था धोक्यात आली आहे. सर्वसामान्य नागरिक जागरुक होऊन सर्व प्रकारच्या भ्रष्टाचाराला विरोध करण्यासाठी प्रयत्न केले तर खऱ्या अर्थाने या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असलेली लोकशाही राज्यपद्धती अस्तित्वात येईल, असे मत मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती पुखराज बोरा यांनी व्यक्त केले.

सावानाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात शनिवारी (दि. २२ ) ग्रंथाली प्रकाशानाच्या वतीने सेवानिवृत्त जिल्हाधिकारी बी.जी. वाघ लिखित 'घटनात्मक मूल्यांचा विकास व ऱ्हास, संविधान : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बौद्धिक चरित्र ' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोरा बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर बार कौन्सिल ऑफ नवी दिल्लीचे सदस्य ॲड. जयंत जायभावे, ज्योती स्टोअर्स ग्रंथ दालनाचे संचालक वसंत खैरनार, सेवानिवृत्त जिल्हाधिकारी व पुस्तकाचे लेखक बी. जी. वाघ उपस्थित होते. याप्रसंगी बोरा पुढे म्हणाले की, लेखक बी.जी. वाघ यांनी आपल्या पुस्तकात घटनात्मक मूल्यांच्या संदर्भात चर्चा केली असून, काही ठिकाणी अत्यंत स्पष्टपणे आपले मत व्यक्त केले आहे. तसेच यात अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधीजींची भूमिका एकमेकाला पूरकच होती. राज्यघटनेने सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. परंतु राजकीय व्यवस्थेला स्वतःचा धर्म नाही, ती धर्मनिरपेक्ष आहे. याप्रसंगी ॲड. जयंत जायभावे म्हणाले की, आजच्या काळात प्रत्येकाने संविधान समजून घेण्याची गरज आहे. राष्ट्राच्या विकासाचे तत्व म्हणजे संविधान होय. राष्ट्रगीताप्रमाणे आपण संविधान उद्देशिकेचे पाठांतर करायला हवे. उद्देशिकांचा मूळ उद्देश काय हे समजून घेतले पाहिजे.

यावेळी लेखक बी. जी. वाघ यांनी आपल्या मनोगतात पुस्तकाच्या निर्मितीची संकल्पना स्पष्ट केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे, संविधानाचे आणि संविधानाच्या उद्देशिकेचे पूजन करण्यात आले. ग्रंथालीचे विश्वस्त सुरेश हिंगलसपूरकर काही कारणास्तव उपस्थित राहू शकले नाहीत त्यांचे मनोगत वैशाली ताजणे यांनी वाचून दाखविले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय ज्योती स्टोअर्सचे संचालक वसंत खैरनार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा बोराडे यांनी केले. आभार प्रदर्शन निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी विजय पवार यांनी केले. कार्यक्रमास माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, आकाशवाणीचे निवृत्त संचालक उत्तमराव कोळगावकर, सावानाचे संचालक संजय करंजकर, चंदुलाल शाह, प्रा. डॉ. यशवंत पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, वसंत व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी, मानवधन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कोल्हे, सेवानिवृत्त महसूल उपाआयुक्त कुलकर्णी, सेवानिवृत्त अधिकारी धर्मेंद्र मुल्हेरकर, डॉ. गुंजाळ, सुरेश पवार, रवींद्र मालुंजकर आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# डाऊन सिंड्रोमची लक्षणे असलेल्या बालकांची तपासणी करावी : जिल्हा शल्य चिकित्सक



**नाशिक ।** डाऊन सिंड्रोम असणाऱ्या रुग्णांना आरोग्य, शैक्षणिक, कौटुंबिक आणि सामाजिक स्तरावर पाठबळाची आवश्यकता असते. त्यासाठी सर्वांनी सहकार्य केल्यास डाऊन सिंड्रोम असलेल्या रुग्ण सर्वसामान्यांप्रमाणे जीवन जगू शकतात. अशा रुग्णांच्या पालकांनी जिल्हा रुग्णालयातील शीघ्र हस्तक्षेप केंद्रात नियमितपणे तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे यांनी केले.

जन्मत: शरीरातील गुणसूत्रांच्या विभाजनात होणाऱ्या त्रुटीमुळे डाऊन सिंड्रोम हा आजार होतो. साधारणपणे ७०० नवजात बालकांमध्ये एक एवढे याचे प्रमाण आहे. २१ मार्च हा दिवस जगात डाऊन सिंड्रोम दिन म्हणून साजरा केला जातो. 'आमच्या समर्थन प्रणालीमध्ये सुधारणा करा',अशी या वर्षाची संकल्पना होती. या पार्श्वभूमीवर जिल्हा रुग्णालयात आयोजित कार्यक्रमाचे उदघाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नीलेश पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप सूर्यवंशी, डॉ. अनंत पवार, बालरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत सुरवसे, डॉ. नीलेश अहिरे, डॉ. मोहन वारके, जिल्हा बालरोग तज्ज्ञ असोसिएशनचे डॉ. सागर भालेराव, डॉ. अतुल बोंडे आदी उपस्थित होते. डॉ. शिंदे म्हणाले की, जन्मत:च शरीरातील जनुकीय त्रुटींमुळे बालकांमध्ये डाऊन सिंड्रोम या आजाराची लक्षणे जाणवतात. त्यामुळे बौद्धिक व शारीरिक विकासात काही समस्या निर्माण होऊ शकतात. वैद्यकीय व्यावसायिक रक्ताच्या नमुन्यांद्वारे गुणसूत्रांची तपासणी करून या आजाराचे निदान करतात. जिल्हा रुग्णालयातील जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्राच्या वतीने डाऊन सिंड्रोम असणाऱ्या बालकांची तपासणी करण्यात येते. त्यानुसार आवश्यक भौतिक उपचार केले जातात. बालरोगतज्ज्ञ डॉ. अविनाश गोरे यांनी डाऊन सिंड्रोम याविषयीची माहिती सादर केली. यावेळी डॉ. भालेराव, डॉ. शीतल पगार, डॉ. बोंडे यांनी व्याधीग्रस्त मुलांसाठी कविता सादर केली. डॉ. मधुरा धारणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सारिका वाघ यांनी आभार मानले.

# रंगभूमीशी नाळ जुळलेला कलाकार : योगेश्वर थोरात

**सां**स्कृतिक नाशिक नगरीत रंगभूमीशी नातं जोडले गेलेले अनेक छोटे-मोठे कलाकार आहेत. मराठी-हिंदी नाटकं, व्यावसायिक नाटकं, एकांकिका, एकपात्री प्रयोग, वेब सिरीज, टेलिफिल्म, मराठी-हिंदी धारावाहिक, सिरियल्स, मराठी-हिंदी चित्रपटाच्या माध्यमातून या कलाकारांनी छोट्या-मोठ्या सहकलाकारांच्या भूमिका आपल्यातील अभिनयाने साकारल्या आहेत. या कलाकारांना जर कुठेतरी चांगली लिफ्ट मिळाली, संधी मिळाली तर ते नक्कीच नाशिकचा ठसा नाट्य-चित्रपट क्षेत्रात उमटवतील यात शंका नाही. अशाच गुणी कलाकारांपैकी योगेश्वर थोरात यांचे नाव घेता येईल.

घर-संसार, व्यवसाय, जबाबदाऱ्यांच्या रहाटगाडग्यात अडकलेले असतानाही वेळात वेळ काढून थोरात यांनी आपल्यातील अभिनयाला वाव देण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. हिंदी-मराठी नाटकं, वेबसिरीज, टेलिफिल्म, टीव्ही सिरियल्स, मराठी चित्रपट यामध्ये विविध छोट्या-मोठया भूमिका त्यांनी साकारल्या आहेत. रंगभूमीवर काम सुरु करुन कुठंतरी जम बसविण्याची खटपट करोत असतानाच थोरात यांना अभिनय क्षेत्रापासून जरा दूर व्हावे लागले. तब्बल १० वर्षांनी त्यांनी पुन्हा स्वतःला रंगभूमीशी जोडले. विविध भूमिका साकारत सातत्य कायम ठेवले. त्यासाठी मेहनत घेतली, वेळ खर्च केला, संघर्ष केला व करीतच आहेत. 'दि सन ऑफ इंडिया' या हिंदी नाटकापासून थोरात यांनी अभिनयाचा श्रीगणेशा केला.



'दि सन ऑफ इंडिया'च्या टेलिफिल्ममध्येही थोरात यांनी काम केले. त्यानंतर पिंडकौल, गाढवाचं लग्न, गांधीजींचे माकड, दो वक्त की रोटी (हिंदी) आदींसह विविध नाटकांत छोट्या-मोठ्या भूमिका केल्या. उकिरडा, खेळीया, तीन चोक तेरा, सत्तांध, वस्तू, जित्याची खोड, मनाचिया गुंफी (एकांकिका), साधुसंत येती घरा, धर्ममाया आदींमध्ये नाट्यविष्कार केले. त्यांनी इंद्रायणी या कलर्स टीव्हीवरील सिरियलमध्ये केलेली सावकाराची भूमिका लक्षवेधी ठरली आहे. याशिवाय त्यांनी "सुंदरा मनात भरली" , "तुझ्या माझ्या संसाराला आणि काय हवं" , "जय अठरा भुजा सप्तश्रुंगी माता" , "जय योगेश्वर जय शंकर" , "लग्नाची वाईफ वेडिंगची बायको" आदी कलर्स मराठी, ई टीव्ही, झी मराठी वाहिन्यांवरील सिरियल्मध्येही भूमिका साकारल्या आहेत. वैतागलेला बाप, सरपंच, पुजारी, सावकार, गांवकरी, हवालदार, महाराज अशा अनेक भूमिका योगेश्वर थोरात यांनी वटविल्या आहेत. नायकाचा मित्र, सहकारी यासह सिरियल्स, चित्रपटात छोट्या-मोठ्या भूमिकेतून अभिनय केला आहे. चलत जाहिरातीतूनही त्यांनी काम केले आहे. अजून खूप काही करण्याची त्यांची ईच्छा आहे. त्यासाठी त्यांचे प्रयत्न, मेहनत करणे नित्य सुरूच आहे. नाशिकमधील कलाकारांना चांगले व्यासपीठ मिळावे यासाठीही त्यांचे प्रयत्न सुरु असतात. उत्तम सुवर्ण कारागीर असलेले थोरात अनेक वर्षांपासून उदरनिर्वाहासाठी विमा व्यवसाय करीत असून, वेळात वेळ काढून रंगभूमीचा छंद जोपासण्याचा गोमटा प्रयत्न करीत आहेत. नाशिकरोड परिसरात त्यांचे वास्तव्य आहे.





# आश्चर्य : मंडल अधिकाऱ्यांनी नोंदविला मृत व्यक्तीचा जबाब

## चूक निदर्शनास येऊन देखील आदेश रद्द करण्यास दिरंगाई; सूत्रधाराला वाचविण्याचे प्रयत्न?

**नाशिक ।** पाथर्डी शिवारातील आदिवासी गृहनिर्माण संस्थेच्या मालकी हक्कात मृत व्यक्तीचे नाव लगल्याचे प्रकरण गंभीर असताना शासकीय स्तरावर मात्र कागदी सोपस्कार पाडले जात आहे. तहसीलदारांनी काढलेला आदेश चुकीचे असल्याचे निदर्शनास आणूनदेखील ठोस कारवाई होत नसल्याने या प्रकरणा मागे असलेल्या सूत्रधाराचा बचाव केला जात आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, तत्कालीन मंडल अधिकाऱ्यांची भूमिका देखील संशयास्पद असून, त्यांनी चक्क मृत व्यक्तीचा जबाब नोंदवून घेतल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पाथर्डी येथील भोलेनाथ आदिवासी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मालकी हक्कात मृत व्यक्तीचे नाव दाखल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. दिनांक २४ऑगस्ट २०२१ रोजी तहसीलदार कार्यालयात अर्जदार म्हणून माधव सखाराम डामसे यांचे नावे अर्ज दाखल करण्यात आला. त्या अर्जावर अहवाल सादर करण्याची जबाबदारी तत्कालीन मंडल अधिकाऱ्याकडे होती. सहकारी संस्थेच्या मालकी हक्कात एखाद्या व्यक्तीचे नाव लावण्याची प्रक्रिया अत्यंत संवेदनशील असताना तत्कालीन मंडळ अधिकाऱ्यांनी मृत असलेल्या अर्जदार यांचा जबाब घेऊन त्याचा अहवाल ३ सप्टेंबर २०२१ रोजी तहसीलदार कार्यालयात जमा केला. या अहवालाचा संदर्भ तहसीलदारांनी आपल्या आदेशात घेतला आहे. अर्जदार डामसे २७ जून २०२१ रोजी मृत पावले आहे. तर ३ सप्टेंबर २०२१ रोजी मंडल अधिकाऱ्यांनी मृत व्यक्तीचा जबाब घेतला का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. मंडल अधिकाऱ्यांनी नेमका कुणाच्या दबावाखाली अहवाल तयार केला याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.






२०२२ मध्ये हे प्रकरण थंड झाल्यानंतर ७ ऑगस्ट २०२४ मध्ये तहसीलदार कार्यालयात अचानक आदेश झाल्याने या प्रकरणामागे काही अदृश्य शक्ती कार्यरत आहे का? असा संशय व्यक्त केला जात आहे. इतक्या गंभीर प्रकरणात अर्जदार मृत पावल्याचे संस्थेच्या सभासदांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणूनदेखील अद्याप याप्रकरणी कुठलीही कारवाई न झाल्याने महसूल अधिकाऱ्यांची कार्यपद्धती संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. आपला आदेश चुकीचा असल्याचे समजल्यानंतरही या प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश देण्याची अपेक्षा असतानाही अधिकाऱ्यांनी महसुली कारवाईचा फार्स निर्माण करत यामध्ये पुन्हा अपर तहसीलदारांकडे सुनावणी ठेवण्यात आली आहे. अपर तहसीलदार पुढील महिन्याच्या १८ तारखेपर्यंत वैयक्तिक कारणास्तव रजेवर असल्याचे समजते. म्हणजेच इतक्या गंभीर प्रकरणात शासनाकडून चालढकल सुरू असल्याचे दिसून येत आहे. इतकेच नाही तर शासनाकडून यामागे असणाऱ्या सूत्रधारचा बचाव होत असल्याचे आरोप केला जात आहे. मृत व्यक्तीचा जबाब घेणाऱ्या मंडल अधिकाऱी तसेच यामध्ये सहभागी असलेल्या महसुली अधिकाऱ्यांची चौकशी होणार आहे का?असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## तीन दिवस १ एप्रिलपासून विविध कार्यक्रम; वैदिक विद्वानांचा सन्मान सोहळा

### श्री शारदापीठाधीश्वर शंकराचार्य श्रीश्री भारतीतीर्थ महास्वामीजी यांचा अमृतमहोत्सव

**नाशिक ।** श्री शारदापीठाधीश्वर जगद्गुरू शंकराचार्य श्री श्री भारतीतीर्थ महास्वामीजी यांच्या अमृतमहोत्सवा निमित्त १ एप्रिल पासून तीन दिवस श्री श्रृंगेरी शंकराचार्य मठ, सरदार चौक, श्री काळाराम मंदिर रोड, पंचवटी येथे चतुर्वेद संहिता पारायण व अमृत महामृत्युंजय याग, वैदिक विद्वानांचा सन्मान सोहळा यासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती श्री शृंगेरी शंकराचार्य मठ पंचवटीचे ऑनररी व्यवस्थापक रामगोपाल व्ही अय्यर यांनी दिली.

दक्षिणाम्नाय श्री श्रृंगेरी शारदापीठाचे पूज्यपाद जगद्गुरू शंकराचार्य श्री श्री भारतीतीर्थ महास्वामी यांचा ७५ वा दिव्यजन्मोत्सव (अमृतमहोत्सव) जगद्गुरू शंकराचार्य श्री श्री विधुशेखर भारती महास्वामी यांच्या शुभप्रेरणा व आशीर्वादाने मंगळवार दि. १ एप्रिल ते गुरूवार ३ एप्रिलपर्यंत श्री श्रृंगेरी शंकराचार्य मठ, सरदार चौक, श्री काळाराम मंदिर रोड, पंचवटी, नाशिक येथे साजरा होत आहे. या कार्यक्रमात ऋग्वेद संहिता पठण घनानंद वेदमूर्ती अमरदीप कुरमभट्टी, कृष्णयजुर्वेद- वेदमुर्ती मंगेश बावीकर (सातारा), शुक्ल यजुर्वेद- घनपाठी वेदमूर्ती निखिल प्रसाद (आळंदी), सामवेद- वेदमूर्ती कृष्णा पळसकर (दत्तधाम) ' अथर्ववेद- वेदमूर्ती दिनकर जोशी (नाशिक) आदी सहभागी होणार आहेत. याप्रसंगी वैदिक विद्वानांचा सन्मान सोहळा होणार आहे.



त्याचप्रमाणे महर्षी गौतम गोदावरी वेद विद्या प्रतिष्ठानचे प्रधानाचार्य वेदमूर्ती रवींद्र पैठणे गुरुजी हे मुख्य यज्ञाचार्य असतील तर सहाय्यक वेदमूर्ती दिनेश गायधनी, वेदमूर्ती संतोष जोशी, वेदमूर्ती श्रीपाद गायधनी, वेदमूर्ती मंगेश जोशी, वेदमूर्ती प्रणव कावळे, वेदमूर्ती जीवन भटमुळे, वेदमूर्ती प्रसन्न जोशी, वेदमूर्ती अंकित पांडे, वेदमूर्ती चंदन पांडे आदी सहभागी होणार आहेत. यानिमित्त चैत्र शुद्ध चतुर्थी मंगळवार दि. १ एप्रिल, सकाळी ९.०० वा. चतुर्वेद संहिता पारायण प्रारंभ होईल. यात चतुर्वेदोक्त शांतीसूक्त पठण, प्रधान संकल्प, गणपती पूजन, पुण्याहवाचन, मातृका- पूजन, नांदी, आचार्यादि ब्राह्मण वरण, दिक् रक्षण पंचगव्य करणं. स्थंडिल देवता स्थापन, पंचभूसंस्कार, सर्वतोभद्र मंडल देवता स्थापन, अमृत मृत्युंजय, सप्तचिरंजीव, मार्कंडेय प्रतिष्ठा अभिषेक पूजन, अग्नि मंथन, नवग्रह मंडल स्थापन पूजनम, रुद्र वरुण स्थापन पूजनम्, नवग्रह होमम्, सायंपूजन, महाआरती होईल. तसेच चैत्र शुद्ध पंचमी बुधवार दि. २ एप्रिल, सकाळी ९ वा. चतुर्वेद संहिता शेष पारायण होईल, यात चतुर्वेदोक्त शांतीसूक्त संकल्प, प्रातः पूजन, लघुरुद्राभिषेक, अमृत मृत्युंजय हवन, सप्त चिरंजीव हवन, मार्कंडेय हवन, उत्तरांग बलिदान पूर्णाहुती, गुरू पादपूजा, महाआरती इ. कार्यक्रम होतील. आणि चैत्र शुद्ध षष्ठी गुरूवार दि. ३ एप्रिलला सकाळी चतुर्वेद संहिता पारायण सांगता होईल. सकाळी ७.३० पासून महागणपती हवन, लघुरुद्राभिषेक, नवग्रह हवन, अमृत मृत्युंजय हवन, नक्षत्र हवन, आयुष्य मंत्र हवन, श्री सूक्त हवन, गुरू पादपूजा, महाआरती इ. कार्यक्रम होतील. त्याच प्रमाणे महाप्रसाद वाटप दररोज दुपारी १.३० वा. होईल. त्याचप्रमाणे सामाजिक उपक्रमात विविध शाळांना वस्तू वाटप, कन्या पूजन, कीर्तन आदि कार्यक्रम होणार आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमास सर्वांनी सहपरिवार आणि स्नेहीजनांसह उपस्थित रहावे आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा आवाहन श्री श्रृंगेरी मठातर्फे करण्यात आले आहे.

## टी.बी. मुक्त पुरस्काराने खतवड ग्रामपंचायत सन्मानित

**दिंडोरी ।** नाशिक जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालय व टी. बी. मुक्त ग्रामपंचायत अभियान अंतर्गत गुण गौरव सोहळा नुकताच जिल्हा आरोग्यधिकारी डॉ.सुधारकर मोरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रवींद् चौधरी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी खतवड ग्रामपंचायतला सिल्वर पुरस्काराने गौरवण्यात आले.



गुणगौरव सोहळा प्रसंगी ग्रामपंचायतीला महात्मा गांधी यांचा अर्धाकृती पुतळा व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सरपंच बबन दोबाडे, उपसरपंच सुकदेव खुर्दळ, ग्रा. पं.अधिकारी आर. एच. काथेपुरी, तळेगाव प्रा.आ. अधिकारी आदींनी हा पुरस्कार स्वीकारला.

## दातृत्वाचा ज्ञानयज्ञ उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

**नाशिक ।** दहावीच्या शालांत परीक्षा नुकत्याच संपन्न झाल्या. आता इतर वर्गांच्या परीक्षाही लवकर सुरू होऊन संपन्न होतील आणि पुन्हा नव्या शैक्षणिक वर्षाचे वेध लागतील. नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच शालेय साहित्य घेण्याची लगबग सुरू होईल. मात्र समाजात असेही काही विद्यार्थी आणि पालक आहेत; की ज्यांची परिस्थिती शालेय साहित्य किंवा गणवेश घेण्यासाठी पुरेशी नाही. अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी याही वर्षी 'दातृत्वाचा ज्ञानयज्ञ' हा उपक्रम आपण आयोजित केला आहे.

गेल्या तीन वर्षांपासून या ज्ञानयज्ञात आपल्यासारख्या अनेकांचा सक्रिय सहभाग आणि सिंहाचा वाटा आहे. आपल्यासारख्या मान्यवर आणि संस्थांनी हातभार लावल्याने गेली तीन वर्षे शिक्षणापासून वंचित होऊ पाहणारे अनेक विद्यार्थी हे शिक्षणाच्या प्रवाहामध्ये टिकले. भविष्यात हेच विद्यार्थी उद्याच्या भारताचे जबाबदार नागरिक आणि ज्ञानवंत, गुणवंत, प्रज्ञावंत अधिकारी आणि व्यावसायिक होतील; यात शंकाच नाही. याही वर्षी हा उपक्रम आपण अखंडपणे सुरू ठेवणार आहोत. आपल्या स्वतःसह परिचयातील दानशूर यांना आपण या संदर्भात सहभागी होण्याचे आवाहन करावे. आपणाकडे असलेली नववी आणि दहावीची मराठी आणि सेमी मराठी माध्यमाची पाठ्यपुस्तके, गणवेश किंवा शालोपयोगी साहित्य विशेषतः दप्तर, कंपासपेटी, बूट हेही आपण गरजूंना दिले तर निश्चितच याचा फायदा त्यांना होईल किंवा आपल्याला जर रक्कम स्वरूपात मदत करायची असेल तर आपण रवींद्र सुमन मुकुंदराव मालुंजकर-9850866485 या क्रमांकावर फोन किंवा गुगल पे ने रक्कम पाठवून त्याचा स्क्रीन शॉट 9423090526 या व्हॉट्सअपवर पाठवावा, असे आवाहन दातृत्वाचा ज्ञानयज्ञ परिवारातर्फे करण्यात आले आहे.

## महत्त्वाचे

### क्षयरोग दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबिर

**नाशिक ।** जागतिक क्षयरोग दिनाच्या पार्श्वभूमीवर हास्ययोग समन्वय समिती व नाशिक महापालिकेतर्फे वयाच्या साठ वर्षे पूर्ण केलेल्या सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी शिबीर घेण्यात आले. यावेळी छातीचा एक्स रे तसेच रक्तातील साखरेची तपासणी शिबिर घेण्यात आली. हुतात्मा स्मारक येथे शिबिर संपन्न झाले. शहर क्षयरोग अधिकारी डॉ. शिल्पा दयानंद जिल्हा हास्ययोग समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. सुषमा दगडे, डॉ. यश घोडे यांच्या मार्गदर्शनाखाली 39 ज्येष्ठ नागरिकांची यावेळी तपासणी करण्यात आली. शहरातील वसंत ब्राह्मणकर, आदित्य आगरकर, सुनील कोटगी, राजेंद्र भंडारी, छाया नवले तसेच समन्वय समितीचे सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. अनेकांनी शिबिर यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

### गंगापूर रोड येथे जलवाहिनीला गळती

**नाशिक ।** गंगापूर रोडवरील विद्या विकास सर्कल, हॉटेल भैरवी जवळ आठ दिवसापासून जलवाहिनी फुटलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात आहे; मात्र महापालिकेचे याकडे दुर्लक्ष होत आहे. एकीकडे शहरात दोन-दोन दिवस सर्वत्र पाणीपुरवठा खंडित असताना येथे हजारो लिटर पाण्याचा अपव्यय होत असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. याबाबत स्थानिक नागरिकांनी तक्रार देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले गेल्याची केल्याचे नागरिकांनी सांगितले. संबंधित जलवानी दुरुस्त करण्याची मागणी करण्यात येत आहे. भैरवी हॉटेलजवळ फुटलेल्या जलवाहिनीचे पाणी रस्त्यावरून वाहत जाऊन समोरच्या चेंबरमध्ये जाते. त्यामुळे चेंबर फुटण्याची शक्यता आहे. याकडे परत लक्ष देण्याची गरज आहे.

### मविप्रच्या प्रांगणात रंगणार 'ललित कला उत्सव

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संचलित ललित कला महाविद्यालयातर्फे गुरुवार, दि. २७ मार्चपासून 'ललित कला उत्सव' वार्षिक प्रदर्शन-२०२५चे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून, दि. ०१ एप्रिलपर्यंत कला रसिकांना या प्रदर्शनाचा लाभ घेता येणार आहे. गंगापूर रोडवरील केटीएचएम महाविद्यालयाच्या आवारातील ललित कला महाविद्यालय कलादालनामध्ये दि. २७ मार्च रोजी सकाळी ११:३० वाजता संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उदघाटन होईल तर सभापती बाळासाहेब क्षीरसागर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील धोपावकर यांच्यासह मविप्रचे सर्व कार्यकारणी सदस्य, स्थानिक व्यवस्थापक समिती सदस्य, सर्व शिक्षणाधिकारी उपस्थित राहणार आहे. याप्रसंगी प्रसिद्ध निसर्गचित्रकार ज्ञानेश्वर डंबाळे हे निसर्गचित्राचे प्रात्यक्षिक तर रवींद्र दंडगव्हाळ हे रचनाचित्राचे प्रात्यक्षिक करणार आहेत. तसेच, ललित कला महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह गायन, वादन, नृत्य सादर करणार आहेत. कलारसिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक तथा शिक्षणाधिकारी प्रा. डॉ. विलास देशमुख आणि प्राचार्य मुंजा नरवाडे यांनी दिली.

### प्रल्हाद उकंडी यांचे निधन

**एकलहरे ।** रिसोड तालुक्यातील एकलासपूर येथील प्रल्हाद उकंडी यांचे (वय ४७) यांचे अपघाती निधन झाले,त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, पत्नी असा परिवार आहे. येथील प्रगतिशील शेतकरी लताबाई शिराळ यांचे ते बंधू होत.



## इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकची दुरावस्था, नागरिक त्रस्त; मनपाचे दुर्लक्ष

**नाशिक ।** शहरातील इंदिरानगर जॉगिंग ट्रॅक हा नागरिकांसाठी महत्त्वाचा व्यायाम आणि आरोग्यदायी फिरण्याचा मार्ग आहे. रोज सकाळी आणि संध्याकाळी अनेक नागरिक येथे चालण्यासाठी, व्यायामासाठी येतात; मात्र सद्यस्थितीत या ट्रॅकची परिस्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. महापालिकेच्या दुर्लक्षामुळे येथे अस्वच्छता आणि सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.



धूळ आणि अस्वच्छतेमुळे आरोग्य धोक्यात आले असून, या ट्रॅकवर नियमितपणे पाणी न मारल्यामुळे मोठ्या प्रमाणावर धूळ उडते. नागरिक चालताना आणि धावताना सतत या धुळीचा त्रास सहन करावा लागतो. नियमित देखभाल आणि व्यवस्थापनाच्या अभावामुळे हा ट्रॅक अडचणींचा ठरत आहे. येथे साफसफाईचा अभाव असून, ट्रॅकच्या परिसरात मोठ्या प्रमाणात पाला-पाचोळा साचलेला आहे. महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांकडून नियमित साफसफाई होत नसल्याने कचऱ्याचे ढीग साचत चालले आहेत. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे. सकाळी फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना या अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. रात्री मद्यपींचा उपद्रव राहतो. त्यामुळे महिलांना अडचण होते. संध्याकाळच्या वेळी या ट्रॅकवर मद्यपींचा वावर वाढत आहे.

काही व्यक्ती येथे बसून मद्यपान करतात आणि परिसरात गैरवर्तन करतात. त्यामुळे महिला व ज्येष्ठ नागरिकांना या ठिकाणी येताना असुरक्षित वाटते. नागरिकांनी याबाबत वारंवार तक्रारी केल्या असल्या तरी प्रशासनाकडून योग्य उपाययोजना केल्या जात नाहीत. ट्रॅकवर बसवलेली म्युझिक सिस्टम देखील अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहे. पूर्वी या ठिकाणी संगीतामुळे नागरिकांना सकारात्मक वातावरण मिळत होते, मात्र आता ती सुविधा बंद पडल्याने जॉगिंग करणाऱ्यांना उत्साह वाटत नाही.

## मनशांतीसाठी हृदयपूर्णतेचे ध्यान आवश्यक : डॉ. कश्यपे

निफाड । कर्मवीर काकासाहेब वाघ कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पिंपळगाव येथील मानसशास्त्र विभाग आयोजित 'हार्टफुलनेस मेडिटेशन' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली.




यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, डॉ. रोहन कश्यपे हार्टफुलनेस प्रशिक्षक नाशिक, डॉ. सुप्रिया बंगेरा, डॉ.प्रिया बटवल, मकरंद मुळे, राठोड उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप माळी, प्रा. धनंजय देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. अतिथींचा परिचय आणि प्रस्ताविक संयोजक डॉ. माळी यांनी केले. उत्तर प्रदेशातील फत्तेडगड येथील श्रीरामचंद्र अर्थात लालाजी महाराज यांनी हार्ड फूलनेस मेडिटेशन सुरू केले. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने आजादी का महोत्सवाच्या निमित्ताने हा कार्यक्रम देशभरात राबवण्याचे आवाहन केले. ध्यान आणि हृदयपूर्णतेचे ध्यान यातील फरक सांगून प्रेम, दया, करुणा, कृतज्ञता यासारख्या सकारात्मक भावना हृदयपूर्णतेच्या ध्यानातून साध्य होतात असे प्रस्ताविकातून सांगितले. सर्व अतिथींचा यथोचित सन्मान करण्यात आला. डॉ. रोहन कश्यपे, हार्टफुलनेस मेडिटेशनचे प्रशिक्षक तसेच रेडिओलॉजिस्ट स्पार्क डायग्नोस्टिक नाशिक यांनी आपल्या मनोगतात अलीकडच्या धकाधकीच्या जीवनात मनशांतीसाठी हृदयपूर्णतेचे ध्यान आवश्यक असल्याचे सांगितले. या ध्यान प्रकारात हृदयावर लक्ष केंद्रित करून सूक्ष्महालचालींची अनुभूती घेतली जाते. हृदयामध्ये प्रेम दया करुणा कृतज्ञता यासारख्या सकारात्मक भावना निर्माण होऊन इतरांविषयी आपल्यामध्ये सलोख्याचे प्रेमाचे संबंध निर्माण होतात असे सांगितले. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत या उपक्रमाच्या माध्यमातून आत्मिक आनंद देण्याचा प्रयत्न करत असल्याचे नमूद केले. त्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष ध्यान प्रक्रिया समजावून सांगताना सर्व सहभागींना डोळे मिटायला सांगून हृदयपूर्ण ध्यानाच्या अनुभूतीच्या आनंद दिला. त्यानंतर श्री.मकरंद मुळे यांनी या अनुभूती विषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधला काही अनुभव सांगून शंका समाधान केले. अध्यक्ष मनोगतात अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉक्टर ज्ञानोबा ढगे यांनी या उपक्रमाच्या आयोजनाबाबत आनंद व्यक्त केला. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, कौशल्यांबरोबर आंतरवैयक्तिक संबंध महत्त्वाचे असल्याचे सांगितले. हार्ट फुलनेस मेडिटेशनच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांनी हार्ट टू हार्ट अशा प्रकारचे एकमेकांच्या सुखदुःखाचे अनुभव घ्यावे व त्यातून विकास साधावा. भावनिक, मानसिक, सामाजिक संतुलन राखावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक धनंजय देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य दिलीप माळवदे यांनी केले. या कार्यशाळेसाठी बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. दीपा कुचेकर, प्रा. सातभाई, प्रा. निलेश आहेर, डॉ. कुदनर, डॉ.सुदेवाड, प्रा. राजेंद्र जाधव, प्रा. बागलावे, प्रा.पगार, प्रा. चव्हाण, डॉ. पठारे, डॉ. सोनवणे, प्रा. श्रीमती डुकरे, प्रा. श्रीमती कदम आदी प्राध्यापक व सेवक उपस्थित होते.

# नवा मुद्दा : दिशा सालियान

औरंगजेबाचा मुद्दा काही अंशी मंदावल्याचे दिसुन येत आहे. छावा चित्रपट बघितल्याने मुघल सम्राट औरंगजेबच्या व्यक्तिमत्वाविषयी भारतीय जनतेच्या मनात अतिशय द्वेषाची भावना निर्माण झाली.या द्वेषभावनेतून संभाजीनगर येथील औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची एकमुखी मागणी होऊ लागली.

हिंदूत्ववादी संघटना या कामी पूढे होत्या. त्यानंतर नागपूर येथे जातीय दंगल उसळली. समाजासमाजात तेढ निर्माण झाली. अनेक निरपराध लोक यात नाहक बळी ठरले. शासकीय संपतीचे नुकसान झाले. हिंदू विरुद्ध मुस्लीम असा नागपूरच्या दंगलीला रंग देण्याचा प्रयत्न झाला. वातावरण पुन्हा बिघडेल अशी परिस्थिति निर्माण झाली. पोलिसावर हल्ला करण्यात आला. दगडफेक, जाळफोळ करण्यात आली. जवळपास ३० वाहने जाळण्यात आली. संपूर्ण देशात या दंगलीचा वनवा पेटतो की काय? अशी एकूण परिस्थिती निर्माण झाली.

त्यातही काही नेत्यांच्या चिथावणीखोर बोलण्यामुळे सामाजिक परिस्थिती अजून बिकट झाली. अशा परिस्थितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनिल आंबेकर यांनी संघाची भूमिका स्पष्ट केली. औरंगजेबाचा मुद्दा हा सध्या संयुक्तीक वाटत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर सध्या माहोल शांत झाला. संघाने उशिरा का होईना आपली प्रतिक्रिया दिल्यामुळे वाद थोडा शांत झाला.

तमाम हिंदुत्ववादी संघटना शांत झाल्या. औरंगजेबाची कबर संरक्षित स्थळ म्हणून घोषित करण्यात आले. मात्र हिंदूत्ववादी संघटनानी बाबरी मश्जीद सारखीच औरंगजेबाची कबरीची स्थिती निर्माण करु असा इशारा दिल्यामुळे वादाची ठिणगी पुन्हा जिवंत झाली.

औरंगजेबाचा मुद्दा शांत होतो न होतो तोच आमच्या राजकारण्यांनी दिशा सालियान मुद्दा पुन्हा उकरून काढलेला आहे. पाच वर्षापूर्वी म्हणजेच ८ जुन २०२० ला दिशा सालियानचा मृत्यू झाला होता. चौदाव्या मजल्यावरुन पडून तिचा मृत्यू झाला होता. ही आत्महत्या होती की हत्या? यावर बरेच रणकंदन झाले.

पोलीस तपासात ही आत्महत्या होती, असे पुढे आले होते. ज्या रात्री आत्महत्या झाली होती त्या वेळेला कोणतीही पार्टी नव्हती किंवा दिशावर बलात्कार झाला नव्हता, असा निष्कर्ष पोलीसांनी त्यावेळेला काढला होता. मात्र नारायण राणेंनी उद्धव ठाकरेंना बदनाम करण्यासाठी या प्रकरणात आदित्य ठाकरेंचे नाव जोडण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणात तीन सदस्यीय एसआयआय. नेमण्यात आली. त्यांचा सुद्धा रिपोर्ट आत्महत्या असाच आला. आता दिशा सालीयान प्रकरणाला पाच वर्षाचा कालावधी लोटून गेला. या दरम्यानच्या काळात दिशा सालीयान यांचे वडील सतीश सालीयान यांनी कधीही या प्रकरणाबाबत गेल्या पाच वर्षात उच्च न्यायालय किंवा इतर न्यायालयात याचिका दाखल केलेली नाही. औरंगजेबाचे प्रकरण मिळते न मिळते दिशा सालीयानचा मुद्दा राजकारण्यांनी उकरून काढला व अर्थसंकल्पीय अधिवेशनात यावर गरमागरम चर्चा झाली.

ज्या मनिषा कायदे यांनी सोशल मिडीयावरून आदित्य ठाकरेची बाजू घेतली होती त्यांनी आता आपले सूर बदलले आहे. पक्ष बदल केल्यामुळे आपल्या वाणीत बद्दल घडवून आणलेला आहे, असा आरोप करण्यात आला.

राजकारणी लोकांना आता काही उद्योग राहिलेले नाहीत . रातोरात पक्ष बदलविल्या जात आहेत. स्वतःच्या स्वार्थासाठी पक्ष बदल केला जात आहे. नैतीकतेचा पूर्णता ऱ्हास होत आहे. कुणाकडूनही नैतिकतेची अमंलबजावणी होतांना दिसून येत नाही. राजकारणात वाईट विचारांचा शिरकाव झालेला आहे. पद, प्रतिष्ठा, पैसा या पलीकडे साधनशुचितेला महत्व उरलेले नाही. ही वास्तविक परिस्थिती आहे.

गेल्या पाच वर्षापासून सतिश सालीयान हे गप्प का होते? इतक्या उशिराने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचीका का दाखल केली? असे प्रश्न सामान्य जनतेच्या मनात निर्माण झाले आहेत. आपल्या याचिकेतून त्यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

न्यायालय जो निर्णय देईन तो तर देईलच. खरे काय किंवा खोटे काय ? याचा निर्णय लागेलच. मात्र, पोलीस प्रशासनाने यावर आधीच टिप्पणी केली असल्यामुळे हा विषय अधिवेशनात लाऊन धरल्यामुळे सामान्य माणसाच्या समस्याकडे लक्ष द्यायला आमच्या लोकप्रतिनींना वेळ नाही का.० ? असा प्रश्न या निमित्याने विचारला जात आहे.

राज्यात रोज कुठे ना कुठे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. नापिकी व कर्जबाजारपणा यामुळे शेतकरी वैतागलेला आहे. राज्य शासनाने आपल्या जाहीरनाम्यात शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. हे आश्वासन अर्थसंकल्पात पूर्ण करता आले नाही विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नाही. भ्रष्ट मंत्र्यावर आरोप केल्या जात असतांना सुद्धा त्याला पाठीशी घालण्याचे धोरण स्वीकारल्या जात आहे.


**नितीन कैलासराव गोहने**
**हिरापूर, ता. सावली**
**जि. चंद्रपूर**
**8275393387**


माणिकराव कोकाटे, धनंजय मुंडे,संतोष देशमुख, या प्रकरणावरून लक्ष हटविण्यासाठी सत्ताधारी पक्ष आटोकाट प्रयत्न करीत आहे. २२ उद्योगपतीचे १६ लाख कोटीचे कर्ज माफ केल्या गेले. मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे कोणतेही धोरण सरकारने स्वीकारले नाही. या व अशा अनेक समस्या असतांना लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करीत आहे.

राजकीय चिखलफेकीत वेळ वाया जात आहे. याला फसवा, त्याला फसवा अशा कुरापती केल्या जात आहे. बेभान वक्तत्व करून सामाजिक एकीचा भंग करण्याचा प्रयत्न राजकारण्यांकडून केल्या जात आहे.

सामान्य माणसाला आता राजकारण म्हणजे आखाडा वाटायला लागला आहे. जा सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी लोकांनी निवडून दिले ते न सोडविता जनतेचा हिताच्या नसलेल्या प्रश्नावर चर्चा करणे वेळ घालविणे म्हणजे मतदारांचा अपमान आहे.

ग्रामीण भागात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुलाचे बांधकामे सुरु आहेत. रेती प्रश्न एरणीवर आहे. रेती अभावी ग्रामपंचायतीची कामे, घरकुलाची कामे, सार्वजनिक कामे ठप्प पडलेली आहेत. मात्र सरकारने अजूनही वाळू धोरण आणलेले नाही. घरकुलाच्या रक्कमेतही वाढ केलेली नाही. सामान्य लोकांच्या समस्या अनेक प्रकारच्या आहेत. त्या सोडविण्याचा प्रयत्न करायला हवा. अनावश्यक मुद्यांना राजकीय व्यक्ती प्राधान्य देत आहेत. औरंगजेबानच्या कबरीचा मुद्दा थांबला आहे. दिशा सालीमान प्रकरण नव्याने उकरण काढल्या जात आहे.

औरंगजेबाची कबर ३५० वर्षापूर्वीची आहे. दिशा सालीमान प्रकरण पाच वर्षापूर्वीचे आहे. पोलीस तपासातही काहीही निष्पन्न झाले नव्हते. आता पुन्हाही ते निघणार नाहीच ही परिस्थिती असली तरी जुने तथ्यहीन मुद्दे काढून सभागृहाचा वेळ वाया घालविला जात आहे. सामान्य माणसाचे प्रश्न, कष्टकरी, शेतकरी, बेरोजगार, नौकरदार, यांचे प्रश्नाला प्राधान्य मिळावे हीच अपेक्षा मतदारांची आहे. यादृष्टीने प्रयत्न होतील अशी अपेक्षा करूया.

■ ■ ■

## अनिष्ट रूढी आणि परंपरा हद्दपार करण्याकडे
# साहित्यिकांची लेखणी वळावी

खरं म्हणजे राजकीय , सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक, शैक्षणिक क्षेत्रांमध्ये जशी विभागणी दिसून येते, अगदी त्याचप्रमाणे नजिकच्या काळात साहित्याच्या क्षेत्रात सुद्धा उच्चशिक्षित, अर्धशिक्षित आणि अल्पशिक्षित अशी विभागणी बघायला मिळते.

या उतरंडीनुसार साहित्याच्या क्षेत्रात शाळा, महाविद्यालयामधून विद्यार्थ्यांना मराठीसह अन्य भाषेत विषयानुरूप विद्यादान करणाऱ्या शिक्षक, प्राध्यापकांची संख्या मोठ्या प्रमाणात असून, काही अभिनंदननिय अपवाद वगळता अनेकांनी पदोन्नती अर्थात पैसा प्रतिष्ठा आणि प्रसिद्धीसाठी मराठीसह अन्य विषयांवर संशोधन करून आचार्य पदवी प्राप्त केल्याचे दिसून येते.सोबतच शिक्षक, अधिव्याख्याता म्हणून विद्यार्थ्यांना प्राधान्याने मराठी व अन्य विषयांचे विद्यार्जन करावे लागत असल्याने, आपल्या हुद्यावर चाकोरी करतांना गलेलठ्ठ वेतनासह प्राध्यापकी ही समाजमान्य प्रतिष्ठीत नोकरी सांभाळून साहित्य निर्मिती करणे म्हणजे त्यांच्यासाठी एकत्रितपणे पद, पैसा, आणि प्रसिद्धीतून प्रतिष्ठा आपसुकच योगायोगाने प्राप्त होत असली तरी, त्यासाठी साहित्यिकांनी आपल्या विद्यार्थी दशेपासूनच रात्रंदिवस अभ्यास करून अर्थात मेहनत घेऊन प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली असते.




**आर. एस. तायडे**
**सामाजिक कार्यकर्ते**
**कोणार्क कॉलनी, अमरावती.**
**९४२०१२५७६२**


कोणतेही यश हे सहज प्राप्त होत नसते तर त्यासाठी त्यांनी ठेवलेले सातत्य आणि घेतलेले परीश्रम कारणीभूत असतात.एकमात्र नक्की की, त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील हुद्यांमुळे सहजच त्यांना अभ्यास, वाचन, मनन, चिंतन, संभाषण प्राप्त होऊन, त्यातूनच पुढे प्रसिद्ध मान्यवर साहित्यिक, व्याख्याते बनण्याची संधी त्यांना प्राप्त झालेली असते. ते त्यांच्या विषयात आचार्य पदवीधारक डॉ. असल्याने साहजिकच त्यांच्या साहित्यात व्याकरणाची घट्ट पकड असणे समजून घेण्यासारखे आहे.

परंतु केवळ साहित्यात व्याकरण शुद्ध असल्यानेच समाज परीवर्तन होत नसते यावर सुद्धा त्यांनी विचार करण्याची गरज आहे.कारण संबंधित साहित्याच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शिक्षक, प्राध्यापकांच्या व्यतिरिक्त समाजात ग्रामीण भागापासून तर शहरी भागापर्यंत जो मध्यमवर्गीय साहित्यिक वर्ग आहे, तो इतरत्र आस्थापनेत कार्यरत अथवा खासगी क्षेत्रात काम करीत असतांनाच साहित्य निर्मिती करून तो आपल्यापरीने साहित्यिक योगदान समाजापर्यंत पोहोचवित असतो.

साहित्यातील तिसऱ्या प्रकारात मोडणारा वर्ग म्हणजे अल्पशिक्षित साहित्यिक वर्ग,जो ग्रामीण, अतिदुर्गम, दऱ्याखोऱ्यातील अविकसित भागापासून तर शहरी भागांपर्यंत झोपडपट्टीत वास्तव्यास असलेल्या साहित्यिकांचा वर्ग समजण्यात येतो त्यांनी सुद्धा समाजोपयोगी, प्रबोधनात्मक साहित्य निर्मिती केली असल्याचे दिसून येते.

त्यांच्यातील काही अशिक्षित असल्याने त्यांचे साहित्य ते स्वतःहा कागदावर उतरवू शकले नसले तरी पण, त्यांच्या पुढे बसलेल्या शिक्षित समाजातील श्रोत्यांनी अशिक्षित साहित्यिकांच्या भाषा, बोलीतून त्यांचे विचारसाहित्य कागदावर आणण्याचे महान कार्य केले असून, ते आजच्या पिढीतील साहित्यप्रेमींना साहित्य पर्वणीच ठरत आहे. अशा अशिक्षित, अल्पशिक्षित साहित्यिकांनी आपल्या प्रबोधनातून जे समाज प्रबोधन केले ते खऱ्याअर्थाने आजच्या पिढीला निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

अशा साहित्यिक प्रबोधनकारांमध्ये बहीणाबाई, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, अण्णाभाऊ साठे, नामदेव ढसाळ, वामनदादा कर्डक, विठ्ठल उमप, राजानंद गडपायले, नामदेवराव पाटणकर, बी. काशिनंदा, नारायण सुर्वे, राघोजी बनसोड, उत्तम मुळे, मदन नंदेश्वर अशा कितीतरी ज्ञात-अज्ञात साहित्यिक मान्यवरांचा अत्यंत आदरपूर्वक नामोल्लेख करावा लागेल. जे उच्चशिक्षित नव्हते सोबतच ते अल्पशिक्षित असल्याने त्यांना कोणत्याही सुखसोयी, सुविधा, आर्थिक बळ नसतांना त्यांनी अत्यंत विपरीत परिस्थितीत समाजाच्या अनिष्ट चालीरीती, अमानुष परंपरा विरूद्ध साहित्याची निर्मिती करून समाज प्रबोधन केले. मुळातच ते अशिक्षित अथवा अल्पशिक्षित होते त्यामुळे त्यांच्या साहित्यात खरंच व्याकरणाचा लवलेश तरी होता काय? तरी त्यांचे विचार प्रबोधन माणसांच्या हृदयापर्यंत कसे पोहोचले? याचा विचार प्रतिष्ठित आणि धनसंपन्न, विद्वान साहित्यिक मान्यवरांनी करणे गरजेचे आहे.

आजही देशाच्या एकुण लोकसंख्येच्या तुलनेत अर्धी अधिक जनता निरक्षर आहे, जी ग्रामीण क्षेत्रातील अतिशय दुर्गम भागात राहते.त्यामुळे वाढती धर्मांधता, अंधश्रद्धा, जातियवाद, माणसां माणसांतील भेदभाव, तरुणी- महिलांवरील वाढते अत्याचार, बलात्कार, बेरोजगारी, भ्रष्टाचार, महागाई, ढासळलेले राजकारण अशा प्रकारे सामान्य माणसांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांनी जनजीवन विस्कळित झाले असतांना तळागाळातील शेवटच्या वंचित समाजघटकांना सामाजिक परीवर्तनाच्या दिशेने साहित्यातून प्रबोधन होण्याची अत्यंत गरज आहे.

कालपर्यंत ग्रामिण भागातील अशिक्षीत महिला जात्यावर भल्या पहाटे उठून गाणे गाऊन दळण दळणाऱ्या महिलांची गाणे आपला इतिहास उजागर करीत होत्या. आज आपण सुधारलेल्या समाज व्यवस्थेत वावरत असलो तरी, समाजातील वंचित घटक अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत, भितीयुक्त वातावरणात, धर्मांधतेच्या खाईत लोटल्या जात असून, हजारो उच्चशिक्षित आचार्य पदवी प्राप्त तरुण नोकरीसाठी वणवण भटकंती करीत आहेत.

सामान्यांपासून शिक्षण हिसकावून घेतल्या जात आहे. सत्ताधाऱ्यांकडून पावलोपावली संविधानिक मुल्य पायदळी तुडवल्या जात आहे, गरीबांना महागाईचे चटके असह्य होत आहेत, बेरोजगारीचे संकट अधिकाधिक गडद होत आहे, दिवसाढवळ्या सरपंचासारख्या प्रतिष्ठित माणसांच्या अत्यंत निर्दयीपणे हत्या होत आहे, जिकडे तिकडे गुंडगिरी, झुंडशाही माजविण्याचे प्रकार हल्ली महाराष्ट्रात वाढत्या संख्येने व्हायला लागलेत

अशा समाजविघातक प्रवृत्तीवर अंकुश ठेवण्यासाठी तथा समाजाला भेडसावणाऱ्या विविध सामाजिक समस्यावर किती मान्यवर साहित्यिक आपली लेखणी झिजवत आहेत, हा खरा प्रश्न आहे.

महालात राहणाऱ्यांना झोपडपट्टीतील वेदना समजण्याची गरज आहे आणि त्यादृष्टीने सामाजिक जागृती करण्यासाठी खऱ्या अर्थाने साहित्यिकांची लेखणी झिजणे आवश्यक असतांना त्यांना व्याकरणातील दुर्बळता महत्त्वाची वाटते, परंतु सर्व आघाड्यांवर दुर्बल होत चाललेल्या समाज बांधवांना धिर देण्यासाठी अथवा समाजातील एक सामाजिक घटक समजून त्यांच्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची आवश्यकता कधीच साहित्यिकांना वाटू नये, ही खरी शोकांतिका व चिंतेची बाब ठरते.

सद्यस्थितीत त्यांना साहित्यातील व्याकरण महत्त्वाचे आहे की, येथील व्यवस्थेने हक्कांपासून वंचित ठेवलेल्यांचे सामाजिक संरक्षण महत्त्वाचे आहे, याचा साहित्यिकांनी विचार करण्याची वेळ आली आहे. त्या अनुषंगाने मान्यवर साहित्यिकांना कळकळीची नम्र विनंती करावीशी वाटते की, देश आणि राज्यातील समाज स्वास्थ्य बिघडवल्या जात असतांना त्यांनी व्याकरणाला महत्त्व देऊन साहित्याला गौन न ठरवता सामाजिक परीवर्तनासाठी आपली अमुल्य अशी लेखणी झिजवावी.हिच विद्वान साहित्यिक मान्यवरांकडून अपेक्षा आहे आणि तीच बदलत्या काळाची गरज सुद्धा!

■ ■ ■

# उष्माघात टाळा, आरोग्य सांभाळा...

सध्या उन्हाळा सुरु झाला असून दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. भारतात हवामान खाते व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या निकषानुसार मैदानी भागात ४० डिग्री अंश सेल्सीअस, डोंगराळ भागात ३० डिग्री अंश सेल्सीअसपेक्षा व समुद्र किनारी भागात ३७ अंश डिग्रीपेक्षा जास्त तापमान जात असल्यास त्यास उष्मलाट प्रवण क्षेत्र मानले जाते. उष्मा-लहर ही वातावरणीय तापमानाची स्थिती आहे. ज्यामुळे शारीरिक ताण येतो, ज्यामुळे कधीकधी मानवी जीवनावर अतिशय विपरीत परिणाम होत असतो. कोणत्याही ठिकाणचे कमाल तापमान सलग दोन दिवस 45 अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहिल्यास त्याला उष्मा लहरी स्थिती म्हणतात.

---

वाढत्या तापमानामुळे उन्हात फिरणाऱ्या व्यक्तीला उष्माघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घ्यावयाची काळजी, उपाययोजना याची माहिती या लेखाच्या माध्यमातून जाणून घेण्यात येत आहे.




: संकलन :
**सतिश आनंदराव बगमार**
**माहिती सहायक,**
**जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा.**


बुलढाणा जिल्ह्यामध्ये तापमानाचा पारा वाढत आहे. कडाक्याच्या उन्हाळ्यात तापमानाचा पारा पुढील तीन महिने ४२ ते ४५ अंशांच्या घरात राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या शेतीची कामे सुरू असून शेतमजूर आणि शेतकरी उन्हाची पर्वा न करता शेतात राबतात. त्यामुळे त्यांना उष्माघाताचा फटका बसण्याची सर्वाधिक शक्यता असते.

उष्माघाताचा लोकांना त्रास होऊ नये, यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालयात स्वतंत्र उष्माघात कक्ष सुरू केले आहेत. उष्माघात कक्षात रुग्णांसाठी बेड, कुलर, थंड पाण्याची व्यवस्था, फॅन यासह औषधोपचारासाठी आवश्यक असलेली सर्व सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**उष्माघाताची लक्षणे :** उन्हाळा सुरु झाला की, उन्हात फिरल्यामुळे डोके दुखी, ताप, जास्त घाम येणे आणि बेशुद्ध पडणे, अशक्तपणा जाणवणे, शरीरात पेटके येणे, नाडी असामान्य होणे.

**लक्षणे आढळल्यास घ्यावयाची काळजी:**
व्यक्तीला सावलीच्या ठिकाणी झोपवा, व्यक्तीचे कापडे सैल करा, त्याला द्रव पदार्थ, कैरीचे पन्हे पाजा, तापमान कमी करण्यासाठी थंड पाण्याच्या पट्टया ठेवा, बाधीत व्यक्तीला तात्काळ जवळच्या आरोग्य केन्द्रात घेऊन उपचार आणि वैद्यकीय सल्ला घ्या.

**उष्माघाताची प्रौढांमध्ये दिसणारी लक्षणे :**
शरीराचे तापमान १०४ फॅरन्हाईटपर्यंत (४० डिग्री सेल्सीअस) पोहोचल्यास स्नायुंचे आखडणे, मळमळणे, उलटीचा भास होणे, चिंता वाटणे व चक्कर येणे हृदयाचे ठोके वाढणे, धडधडणे.

**उष्माघाताची लहान मुलांमध्ये लक्षणे :**
आहार घेण्यास नकार देणे, नियीमत चिडचिड होणे, लघवीचे कमी झालेले प्रमाण, कुठूनही रक्तस्त्राव होणे, तोंडाच्या येथील त्वचा कोरडी होणे, शुष्क डोळे होणे.

**उष्माघातामुळे त्रास झाल्यास करावयाचे प्रथमोपचार :**
त्रास झालेल्या मुला,मुलीला लगेच घरात किंवा सावलीत आणावे, संवेदनशील राहुन त्यांचे कपडे सैल किंवा ढिले करावेत, नळाच्या पाण्याने ओल्या केलेल्या पट्टया शरीरावर ठेवाव्यात, उलटी होत असल्यास त्यांना एका कुशीवर वळवावे. जेणेकरुन ते गुदमरुन जाणार नाहीत.

हवा येण्यासाठी पंख्याचा वापर करावा, पायाखाली उशी किंवा तत्सम काही ठेवुन त्यांना आडवे पडायला सांगावे, वारंवार स्वच्छ आणि थंड पाण्याचे घोट पाजावेत, बेशुद्ध असल्यास त्यांना खायला किंवा प्यायला काहीही देण्याचा प्रयत्न करु नये.

**उष्णतेच्या लाटेदरम्यान काय करावे :**
हलके खावे, फळे आणि सलाड सारखे पचायला हलके असणारे अन्न खावे, पुरेसे पाणी प्या, सैल, हलके, फिक्या रंगाचे आणि सुती कपडे परिधान करावेत. गॉगल, छत्री, टोपी, बुट, चप्पल घालूनच घराबाहेर पडावे. प्रवास करतांना पाण्याची बाटली आपल्याजवळ बाळगावी. थंड पाण्याने आंघोळ करावी. घराबाहेरील उपक्रम, मैदानी उपक्रमादरम्यान थोड्या-थोड्या वेळाने विश्रांती घ्यावी. विश्रांतीची वारंवारता वाढवावी.

**उष्माघातापासुन बचावासाठी काय करावे :**
घराबाहेर जाण्यापुर्वी भरपुर पाणी प्यावे, सुती, सैल आणि आरामदायी कपडे घाला. भरपुर ताजे अन्न खाल्यानंतरच घरातुन बाहेर पडा. घराबाहेर जातांना डोके झाका किंवा छत्रीचा वापर करा. पाणी, ताक, ओ.आर.एस पाण्याचे द्रावण किंवा लस्सी, निंबुपाणी, आंबा, पन्हे इत्यादी पेय घ्या.

**उष्माघातापासुन बचावासाठी काय करू नये :**
रिकाम्या पोटी घराबाहेर पडु नका, उन्हात अधिकवेळ राहु नका, तिखट, मसालेदार आणि शिळे अन्न खाऊ नका, नेहमी पाणी सोबत ठेवा, शरिरात पाण्याची कमतरता कमी पडु देवु नका. उष्णतेचा त्रास झालेल्या व्यक्तीची मदत करत असतांना या गोष्टीचा अवलंब करावा.

संबंधित व्यक्तीला थंड ठिकाणी तातडीने हलवावे. शरिराच्या जास्तीत जास्त भागांवर किंवा कपड्यावर थंड पाण्याचा मारा करावा. शक्य असेल तेव्हढा वेळ त्या व्यक्तीला वारा घालावा. शरिराचे तापमान वाढलेले, बेशुद्ध, गोंधळलेली, घाम येणे, थांबलेली अशी आपल्या नजरेस आल्यास टोल क्रमांक 108 किंवा 102 या क्रमांकावर संपर्क साधावा.

उष्माघात ही गंभीर स्थिती असून वेळीच उपचार न केल्यास जीवघेणा ठरू शकतो. त्याची लक्षणे ओळखून तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे.

गरम वातावरणात स्वतःची काळजी घेणे आणि इतरांनाही सावध करणे गरजेचे आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांनी तीव्र उन्हात फिरु नये, आरोग्याची काळजी घ्यावी. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी वरील सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले आहे.

■ ■ ■

# नागपूर दंगल : सुनियोजित कट?

**वाचक लिहितात**

नागपूरमध्ये उसळलेल्या दंगलीसाठी छावा चित्रपट कारणीभूत असल्याचा दावा ऑल इंडिया मुस्लिम जमातचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना शहाबुद्दीन रझवी यांनी केला आहे. त्यांनी या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली आहे. मात्र, हा चित्रपट फेब्रुवारीमध्येच प्रदर्शित झाला होता. जर चित्रपटामुळे लोकांच्या भावना भडकल्या असत्या, तर दंगल तात्काळ घडली असती. मात्र, दीड महिना उलटल्यानंतर अचानक दंगल होणे हे योजनाबद्धरित्या केलेले षडयंत्र आहे असे लक्षात येते.

या चित्रपटाच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास जगासमोर आला. तसेच क्रूरकर्मा औरंगजेबाने महाराजांना कशा यातना दिल्या आणि त्यांची निघृणपणे हत्या केली, हे सत्य देखील सर्वांसमोर आले. परंतु असे अनन्वित अत्याचार बघून हिंदूच्या मनात उफाळलेली चीड कुठेही हिंसाचाराच्या माध्यमातून बाहेर आली नाही. हिंदूंनी फक्त शांततापूर्ण मोर्चे व आंदोलन केले.

परंतु, ही दंगल घडवून आणणारे सर्व आरोपी कट्टर विचारसरणीचे असून,त्यांनीच दंगल घडवून आणली आहे, हे देखील आता स्पष्ट झाले आहे. तरीदेखील हिंदूंना चुकीच्या पद्धतीने जबाबदार ठरवण्याचा प्रयत्न काही प्रसारमाध्यमे आणि राजकीय नेते करत आहेत.

दंगलीत केवळ हिंदूंच्या दुकानांची, घरांची आणि वाहनांची तोडफोड झाली आहे. सार्वजनिक आणि खाजगी संपत्तीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे ही दंगल अचानक उफाळून आलेली नाही, तर एक हा एक सुनियोजित कट होता असे स्पष्टपणे लक्षात येते.

हिंसक जमावाने महिला पोलिसांवरही हल्ले केले, त्यांच्यासोबत अभद्र वर्तन केले. २०१२ मध्ये आझाद मैदानावर झालेल्या दंगलीतही असेच प्रकार घडले होते. असे दंगे म्हणजे कायदा हातात घेणेच नव्हे का? आता तरी शासनाने यासंदर्भात कठोर कारवाई करावी. दंगलीत झालेल्या सार्वजनिक आणि खाजगी संपत्तीची नुकसान भरपाई दंगलखोरांकडून वसूल करावी, त्यांच्यावर कठोर कारवाई केली तरच अशा घटनांवर आळा बसू शकेल. अन्यथा अशा घटना पुन्हा पुन्हा घडतील. म्हणूनच, न्याय व कायद्याचा सन्मान टिकवण्यासाठी कठोर कारवाई होण्याची जितकी आवश्यकता आहे,तितकीच आवश्यकता आज हिंदू समाजाला आत्मरक्षणासाठी संघटित होण्याची आहे.

■ **सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.**

## नागपूर दंगलखोरांवर ठोस कारवाईची अपेक्षा !

नागपूर येथे धर्मांधांनी सुनियोजित दंगल घडवून आणली. या दंगलीमागील सूत्रधार फहीम खानला अटक करण्यात आली. फहीम खानच्या पाठीशी कोण होते, त्याला कोणाचा आदेश होता याच्या मुळाशी जाऊन संबंधितावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

या दंगलीत रस्त्यावर उतरून दुचाकी, चारचाकी, तसेच नागरिकांची घरे यांची हानी केली पोलिसांवर आक्रमणे केली अशी माहितीच फक्त सध्याच्या घडीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी दिली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडून आता बेधडक कारवाईची अपेक्षा आहे.

उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांप्रमाणे आता महाराष्ट्रातही दंगलखोरांवर वचक बसवण्यासाठी दंगलखोरांच्या घरांवर लगेच बुलडोझर फिरवला पाहिजे. यामध्ये जनतेसोबत पोलिसांवर केलेल्या हल्ल्याचे गांभीर्य पाहता मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी आता थातुरमातुर कारवाई न करता ठोस कारवाईच केली पाहिजे. अन्यथा जिहादी धर्मांधांचा आत्मविश्वास अजून वाढेल!

■ **भूषण वाळणुसकर, डोंबिवली.**



# दररोज सकाळी हळदीचे पाणी प्यायल्याने शरीरात काय बदल होतात?

हळद एक असा मसाला आहे जो आपल्या अन्नाची चव आणि रंग वाढवतो. परंतु तो आपल्या आरोग्यासाठी आणि सौंदर्यासाठी देखील खूप फायदेशीर आहे. अन्नापासून ते त्वचेसाठी हळद वापरली जाते.

हळदीमध्ये अँटी-इंफ्लेमेटरी, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-बॅक्टेरियल असे अनेक गुणधर्म असतात जे आपल्या शरीराच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. दररोज सकाळी एक ग्लास पाण्यात अर्धा चमचा हळद पावडर मिसळून प्यायल्याने अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात.

**वेदना कमी करते:** हळदीमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात हळद वेदना आणि सूज कमी करण्यास मदत करते. हे गुणधर्म शरीरातील वेदना आणि जळजळ निर्माण करणाऱ्या केमिकल्सचा परिणाम होऊ देत नाही, ज्यामुळे वेदना आणि सूज कमी होते.

**त्वचेसाठी फायदेशीर :** हळदीमध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात जे त्वचा निरोगी आणि चमकदार बनवण्यास मदत करतात. हे गुणधर्म त्वचेवरील ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करतात, ज्यामुळे त्वचेची वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावते. याव्यतिरिक्त, हळदीमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म देखील असतात जे त्वचेची सूज आणि लालसरपणा कमी करण्यास मदत करतात.

**पचनसंस्था सुधारते:** हळदीमध्ये पाचक एंजाइम असतात जे पचनसंस्थेसाठी खूप फायदेशीर ठरतात. सकाळी नियमितपणे हळदीचे पाणी प्यायल्याने गॅस आणि इतर पचन समस्यांसारख्या पचन समस्यांपासून तुमचे रक्षण होते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते :**
हळदीमध्ये कर्क्यूमिन नावाचे संयुग असते, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. हे संयुग शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते, ज्यामुळे आपल्याला रोगांशी लढण्यास सक्षम बनवते.

**वजन कमी करण्यास मदत करते :**
हळदीमध्ये चयापचय वाढवणारे गुणधर्म असतात जे वजन कमी करण्यासाठी फायदेशीर असतात. हे गुणधर्म शरीराचा चयापचय दर वाढवतात, ज्यामुळे शरीर अधिक कॅलरीज बर्न करते आणि वजन कमी करते.

**त्वचेच्या आरोग्यासाठी उपयुक्त:**
हळदीचे पाणी त्वचेला आतून निरोगी ठेवते. डाग, मुरुम, वयाच्या खुणा कमी होण्यास मदत करते.

**शरीर डिटॉक्स करते:** हळदीचे पाणी यकृताची कार्यक्षमता सुधारते आणि शरीरातील विषारी घटक बाहेर टाकते.


**सांधेदुखी व सूज कमी करते:** हळदीतील दाहनाशक गुणधर्म सांधेदुखी आणि सूज कमी करण्यास प्रभावी ठरतात.

**हृदयविकाराचा धोका कमी होतो:**
हळदीचे पाणी नियमितपणे प्यायल्याने हृदयविकाराचा धोका कमी होतो. म्हणजेच हळदीचे पाणी पिऊन तुम्ही निरोगी आयुष्य जगू शकता. हळदीचे पाणी अत्यंत गुणकारी आहे.

■ ■ ■

## अशोकायन


**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### बळीला मारक धोरण

**नवी तुर येता बाजारात**
**कां बरं कोसळले भाव ?**
**यांच कारण आयातीला**
**परवानगी दिली ना राव . .**

**आज दहा वर्षापूर्वीचा**
**सोयाबीनला मिळतोय भाव**
**महागाई निर्देशांक पाहता**
**कां भावांतर देत नाही राव ?**

**जय जवान जय किसान**
**म्हणून थोपटून घेती पाठ**
**बळीच्या आत्महत्या वाढल्या**
**कारण तो झालाय भुईसपाट ..!**

**निवडून दिलेल्या नेत्यांना**
**सांगा आपल्या व्यथा**
**नको कर्जमाफी पण**
**खर्चाधारीत भाव हवा .. !**

## आज का अंदाज

बुधवार २६ मार्च २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| १४५ | ४७० | ७८९ | १६० | ५९९ | ३६६ | १५० | १८० |
| ३८९ | ५६० | २३९ | ३५१ | ३०० | ७८० | २६८ | ३७९ |
| २८० | ३८० | ३४७ | ८९० | १२० | ११३ | ७९० | २७० |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३२ | ५२ | ६४ | ९४ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३० | ५० | ६१ | ९७ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३८ | ५८ | ६७ | ९१ |


**२६ मार्च: सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६८ | ९८ |
| २० | ५० | ६४ | ९४ |
| २३ | ५३ | ६३ | ९७ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# शब्दकोडे क्रमांक २०६६



**आडवे शब्द :-**
१) अवस
४) ठराव, निश्चय
६) शहर, गाव
८) एक अधिक एक चतुर्थांश
१०) पुरुष
११) निराश
१२) किराणा मालाचा दुकानदार
१३) आई (इं.)
१४) प्रहार
१५) मोटार(इं.)
१६) दिवस
१८) धमनी
१९) जमेची खोटी बाब
२१) अधिक श्रेष्ठ, वरचढ
२३) माल, पैसे मिळाल्याची चिठ्ठी
२५) भिंतीवर सरपटणारा प्राणी
२६) प्रसन्न होऊन दिलेला आशीर्वाद
२८) सुसर
३०) होडी
३१) कावळा
३२) भूपती
३३) प्रेत जाळण्याची चिता
३४) माल साठविण्याची जागा
३५) आकाश
३६) हिस्सा
३८) संपूर्ण
४०) तात्प्रर्यार्थ
४१) नशीब
४२) मार्ग
४३) भारवाहक
४५) कट्टा, ओटा
४८) सैन्याची तुकडी
५०) नवऱ्याचा भाऊ
५१) गयावया करणे
५६) पाळीपाळीने
५९) किंमत
६०) व्यर्थ
६१) धपाटा
६२) वृद्धत्व, थोडे
६३) एक द्विदल धान्य
६५) मालाची विक्री
६७) वर्ष, साल
६८) बैलाच्या मानेवरील जोखड
६९) एक सुगंधी पांढरे फूल
७२) शिकारीचा प्राणी
७३) एक सुगंधी वनस्पती
७५) शरीर
७६) अबोलीची वेणी
७८) नग्न
७९) बोकड
८०) पडसे
८१) हिरा, पाचू इ प्रकार
८२) मोठा नगारा

**उभे शब्द :-**
२) मनुष्य
३) नवरदेव
४) मडके
५) गवंडी
६) होकारच्या विरुद्ध
७) विटी कोलण्याचा खड्डा
८) घर
९) उत्तराधिकारी
११) खोबऱ्याची बर्फी
१२) सतरंजी
१४) नाश, वध
१५) कावळा
१७) महान
१९) नातवाची वा नातीची मुलगी
२०) पाणी
२१) वर्ष, साल
२२) तादाम्य, एकरूप
२४) वरपांगी
२६) हिशेबातील वांधा मिटविणे
२७) खटला
२९) मोजणी करणारा
३१) व्यवस्था, जबाबदारीचे काम
३७) एक श्वासरोग
३९) श्रीरामाचा एक भाऊ
४०) ** बुद्धी नाठी
४४) दडून बसणे
४५) कबूतर
४६) थोर मनाचा, धर्मात्मा
४७) दुसऱ्यांदा
४९) फळाचे साल
५२) ढग
५३) कधीही, केव्हाही
५४) दारूचा एक प्रकार
५५) चरण्याची जागा
५७) मोजकेपणा, मितता
५८) काचेला आरसा बनविणारा घटक
६३) कपि
६४) घट्ट
६५) डोक्यातला फोड .
६७) मनाचा झालेला ग्रह
६९) आम्रवृक्षाची मंजिरी
७०) संताप
७१) विश्रांती
७२) लाकडाचे एक उत्तम जात
७४) गंध
७७) उचलण्यास वजनदार

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ख | डा | जं | गी | | सा | ठे | बा | ज | | ह | रा | म | खो | र |
| स | | ग | त | का | ल | | व | न | स | र | णी | | ल | क्ष |
| | ढा | ल | | र्या | | क | ळ | क | | ह | व | न | | क |
| स | ल | | क | ल | क | ला | ट | | आ | र | सा | | पां | ग |
| | ग | ळा | | य | | का | | आ | रा | म | | ध | | ण |
| रो | ज | | श | | प | र | क | र | | हा | त | मा | ग | |
| ज | | सा | व | का | र | | र्ण | | | दे | | का | ज | वा |
| गा | ढ | व | | या | | रा | धा | | अ | व | स | | र | स |
| र | ग | | ज | पा | न | | र | वा | ना | | मा | त्र | | क |
| ह | | मं | ग | ल | | म | | त | र | बे | ज | | भा | ट |
| मी | न | | | ट | र | फ | ल | | क | | सु | पा | री | |
| यो | | पो | क | | वा | ल | | वा | ली | | धा | क | | ज |
| ज | व | ळ | पा | स | | र | वा | ळ | | क्षा | र | | पा | प |
| ना | द | | ट | पा | ल | | स | वि | ता | | क | र | व | त |
| | न | फा | | ट | व | का | र | णे | | गो | | जा | | प |

> महत्त्वाचे

## सीएनजी पंपांवरील रांगा टाळून होणार वेळेचीही बचत

**नाशिक ।** आजच्या डिजिटल युगात वाहतूक व्यवस्थापन आणि इंधन भरण्याच्या प्रक्रियेत वेगवान सुधारणा होत असताना अद्यापही सीएनजी इंधन भरण्याच्या प्रक्रियेमध्ये अनेक अडथळे आणि समस्या आढळतात. लांबच लांब रांगा, वेळेचा अपव्यय, वाहतुकीची कोंडी आणि पारंपरिक पेमेंट पद्धतीमुळे होणारा विलंब यामुळे वाहनचालकांना



### मविप्रच्या विद्यार्थ्यांनी विकसित केली फास्टॅग तंत्रज्ञानावर आधारित प्रणाली

मोठ्या प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागते. या सर्व समस्यांवर मविप्र राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रामबाण उपाय शोधला आहे. यासाठी 'अडव्हान्स सीएनजी बुकिंग सिस्टम विथ फास्टॅग टेक्नॉलॉजी' विकसित केली आहे. या प्रणालीमुळे सीएनजी इंधन भरण्याची प्रक्रिया अधिक जलद, कार्यक्षम आणि सुलभ होणार आहे. वाहनचालक आणि इंधन केंद्रचालकांचे व्यवस्थापनही अधिक सोपे होणार आहे. ही प्रणाली केवळ इंधन भरण्याच्या वेळेची बचत करणार नाही, तर वाहतूक कोंडीही कमी करणार आहे. या प्रणालीमध्ये यूजर अप, स्टेशन मॅनेजर आणि वर्कर अशी तीन प्रमुख पॅनेल्स समाविष्ट आहेत. यूजर अप पॅनेल्सद्वारे वापरकर्त्याला जवळचे सीएनजी स्टेशन शोधणे सोपे होते. इंधन उपलब्धता पाहता येऊ शकते, सोयीनुसार १ तासाच्या स्लॉटची बुकिंग आणि सीएनजी किती किलो हवे आहे, हे देखील निवडू शकतात. या १ तासाच्या स्लॉटमध्ये वापरकर्ता कधीही सीएनजी स्टेशनला भेट देऊन इंधन भरू शकतो. स्टेशन मॅनेजर पॅनेलद्वारे सीएनजी स्टेशनचे व्यवस्थापन सोपे होते. स्टेशन मॅनेजर प्रत्येक तासाच्या स्लॉटनुसार सर्व बुकिंग्स पाहू शकतो आणि त्या बुकिंग्सचे व्यवस्थापन करू शकतो. सीएनजी उपलब्धतेनुसारच बुकिंग्स दिल्या जातात, त्यामुळे स्टेशनवर उपलब्ध सीएनजी प्रमाणानुसारच बुकिंग्स होऊ शकतात आणि सीएनजी संपल्यावर बुकिंग्स थांबवले जातात, जेणेकरून स्टेशन व्यवस्थापकास अडचणी येणार नाहीत. यासोबतच, सर्व पेमेंट्स फास्ट टॅगद्वारे करता येणार असल्यामुळे पेमेंटप्रक्रिया स्वयंचलित आणि कॅशलेस म्हणजेच अगदी टोल पेमेंटसारखी होणार आहे. वर्कर पॅनेलद्वारे सीएनजी स्टेशनवर काम करणारा कर्मचारी फास्ट टॅग स्कॅनर सक्रिय करून वापरकर्त्यांच्या वाहनाच्या फास्ट टॅग कार्डची स्कॅनिंग करतो आणि स्वयंचलितपणे पेमेंट प्रक्रिया पूर्ण होते. या प्रणालीमुळे सीएनजी इंधन भरण्याच्या प्रक्रियेला अधिक कार्यक्षम, सुटसुटीत आणि वापरकर्त्याच्या दृष्टने अनुकूल बनवले आहे.

**तंत्रज्ञान विकसित करणारे विद्यार्थी**

या प्रकल्पाची संकल्पना आणि डिझाइन उज्ज्वल मालपुरे, दिक्षांत गायकवाड, भक्ती पाटील, सेजल गिते यांची आहे. या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक प्राचार्य प्रशांत पाटील, विभागप्रमुख माधुरी पाटील यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले आहे.

## मविप्र चित्रकला स्पर्धेत मराठा हायस्कूलच्या १,१०७ विद्यार्थ्यांचे यश

**नाशिक ।** मविप्र चित्रकला स्पर्धेत मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या मराठा हायस्कूलमधील पाचवी ते दहावीच्या एकूण १,१०७ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. या सर्व विद्यार्थ्यांचा विद्यालयामध्ये सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात, उपमुख्याध्यापक चंद्रजीत शिंदे उपस्थित होते. शाळेचा निकाल शंभर टक्के लागलेला आहे. जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत विद्यालयातील एकूण चार विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केलेले आहे. गट क्र. २ (इयत्ता पाचवी व सहावी) मध्ये वेद संतोष पगारे या विद्यार्थ्याने जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत तृतीय क्रमांक, गट क्रमांक ३ (इयत्ता सातवी व आठवी) मध्ये स्वरा हर्षद खोंड या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक, गट क्रमांक ४ (नववी व दहावी) मध्ये साई तात्याभाऊ जाधव या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक तर याच गटात मानसी महेंद्र देवरे या विद्यार्थिनीने चतुर्थ क्रमांक मिळवला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयातर्फे सन्मानित करण्यात आले. रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांना कलाशिक्षक जगदीश डिंगे, केशव खताळे, विशाखा वाघ, चित्रलेखा नाठे, वैभव पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी, सर्व संचालक मंडळ, शिक्षणाधिकारी प्रा. डॉ. भास्कर ढोके, शालेय समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, पालक-शिक्षक संघाचे अध्यक्ष व सर्व सदस्य, मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात, उपमुख्याध्यापक सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# सप्तशृंगी गडावरील अतिक्रमण जमीनदोस्त





**सप्तशृंगी गड ।** श्रीक्षेत्र सप्तशृंगी गडावर वनविभागाच्या हद्दीत झालेल्या अतिक्रमणांविरोधात कळवणच्या वनपरिक्षेत्र अधिकारींनी अतिक्रमण निर्मुलन मोहीम राबविली असून अतिक्रमित जागेत लोखंडी अँगल व उभे करण्यात आले आहे.

सप्तश्रृंगी गडावरील जवळपास ९८ टक्के क्षेत्र (३७४ हेक्टर) वनविभागाच्या कक्षेत येत असून अवघी ९ हेक्टर जागा ही सप्तश्रृंगीगड ग्रामपंचायतींअंतर्गत येते. यात सप्तश्रृंगीगड गाव वसलेले असून गावाची लोकसंख्या साडेतीन हजाराच्यावर आहेत गडावर वनविभागाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत असल्याने गडावर वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याबरोबरच. भावीकांना शिवीगाळ, व मारहाण होण्याबरोबरच यात्रोत्सव काळात भाविकांना पायी चालणेही मुश्कील होते. सप्तशृंगीगडावर. सहाय्यक जिल्हाधिकारी मालेगांव देवदत्त केकान साहेब कळवणचे उपविभागीय अधिकारी अकनुरी नरेश यांच्या अध्यक्षतेखाली १९ मार्चला आपत्ती व्यवस्थापनाविषयी प्रशासनाच्या सर्व विभाग प्रमुख तसेच सप्तशृंगीगड व नांदुरी ग्रामपंचायत, सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, व्यापारी प्रतिनिधी यांच्यासह घेतलेल्या आढावा बैठकीत ग्रामपंचायत व वन विभागाच्या हद्दीतील अतिक्रमणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

यावेळी वनविभागातर्फे पंधरा दिवसांत अतिक्रमण निर्मुलन मोहीम राबविणार असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी दीपावली गायकवाड यांनी सांगितले होते त्यानुसार मंगळवारी (ता.२५) रोपवेच्या प्रवेशद्वारालगतच असलेले अतिक्रमण उपवनसंरक्षक, पूर्वभाग नाशिक उमेश वावरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक वनसंरक्षक पूर्वभाग सोनवणे साहेब, यांच्या उपस्थितीत कळवणच्या वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती दीपावली गायकवाड यांनी देवळा, दिंडोरी, कळवणचा स्टाफ बोलावुन मोहीम राबवली.

काढलेल्या अतिक्रमित जागेत जेसीबीच्या साहाय्याने चारी पाडून त्या चारीत आठ फुटाचे लोखंडी अँगल गाडुन जाळी मारण्यात येणार आहे, तसेच मोकळ्या जागेत वृक्षारोपण करण्यात आले. या मोहिमेत वनपाल धनराज बागुल ,शशिकांत वाघ, योगीराज निकम, वनरक्षक नाना राठोड, गोविंद वाघ, श्रीमती सुवर्णा भोये, श्रीमती सुनीता कोल्हे ,खडकशींग पाल, वनसेवक अमृत पवार आदींनी सहभाग घेतला. अतिक्रमण निर्मुलन मोहिमेस ग्रामपंचायत सप्तशृंगगड, श्री सप्तशृंगी निवासिनी ट्रस्ट, रोपवे, ग्रामस्थ व व्यावसायिक यांनी सहकार्य केले. व अभोणा पोलीसांचे विशेष मोलाचे सहकार्य यावेळी पाहण्यास मीळाले

## लोककला जीवंत ठेवण्याची काळाची गरज : सदाशिव मलखेडकर



**नाशिक ।** जीवनात कीतीही कठिण काळ येऊ द्या, त्यांना सामोरे जाण्यास तयार रहा, आपल्या कलेतून शासनाच्या योजनांची माहिती देणे गरजेचे आहे. लोककलेचे माध्यम मागे पडत चालले आहे. रिल्सच्या या जमान्यात शाहिरीसारखा कलाप्रकार विद्यार्थी शिकत आहे. राज्य शासनाच्या या प्रयत्नांमुळे लोककलेला पुन्हा उभारी मिळेल, असे प्रतिपादन भारत सरकारच्या सूचना व प्रसारण मंत्रालयाचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी सदाशिव मलखेडकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने वाघेरे येथे दि.१५ ते २४ मार्च दरम्यान दहा दिवसीय निवासी शाहिरी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून घोटी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विनोद पाटील, पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किरण रकिबे, ग्रामपंचायत अधिकारी सुजितकुमार सोनवणे, विस्तार अधिकारी किरण रहाडे, इगतपुरी पंचायत समिती सभापती सोमनाथ जोशी, कॉंग्रेस तालूका सरचिटणीस भास्कर गुंजाळ, शाहीर बाळासाहेब भगत, कळसुबाई प्रतिष्ठानचे भगीरथ मराडे, शाहीर राजेंद्र बावनकुळे, शाहीर दत्तराज जोशी उपस्थित होते. प्राचार्य डॉ.रकिबे म्हणाले की, लोककलेचा वापर सामाजिक संदेश देण्यासाठी होत असतो, मात्र या प्रकारांत शाहिरी हा कलाप्रकार इतरांपेक्षा वेगळा आहे. शाहिरी ही प्रेक्षकांच्या मनाला भिडणारी आहे. महाराष्ट्रातील मातीत अनेक मोठमोठे शाहिर झाले आहेत. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बाळासाहेब पलटने यांनी केले, तर आभार कार्यक्रमाचे शिबिर संचालक शाहीर उत्तम गायकर यांनी मानले.

### राज्यभरातून प्रतिसाद

सुरेश भिसे (जालना), भीमराव मोरे (जाफराबाद), दत्तराज जोशी, राजेंद्र बावनकुळे, छगन बावनकुळे, याज्ञवल्क्य जोशी (नागपूर), प्रशांत भिसे (सिन्नर), रवींद्र वरुटे (टाकेद), रवींद्र रोकडे(मुंढेगाव), अशोक चांदुडे (नाशिक), शरद लोहकरे (कल्याण), आकाश पाटील (पाथर्डी), शिवाजी गायकर (संभाजीनगर), किरण बोधक (शहापूर), रवींद्र वाघ (मुलुंड), गणपत बंदावणे(मुकणे), पंढरीनाथ भिसे (अकोले), दौलत घारे (काळुसते), प्रवीण बोधक (ठाणे), गणेश बगाड (अहिल्यानगर), राधिका भागडे (मानवेढे), कल्पेश कांबळे (लातूर), ऋषिकेश नरवटे (मुकणे), जगदीश शिंदे (समनेरे), मच्छिंद्र गणाचार्य, आकाश गणाचार्य (वाघेरे), ओंकार गणाचार्य, विशाल गणाचार्य (घोटी), ओंकार गायकर, दुर्गेश गायकर (वाघेरे), आकाश दिवटे आदी विद्यार्थी उपस्थित होते. या शिबिरात गण, गवळण, भारूड, वासूदेव, पोवाडा, गोंधळ, छक्कड, जोगवा, परसरामी लावणी, खंडोबाची गाणी तसेच देवीची गाणी शाहिरी पेहरावात सादर करण्यात आले.

## आनंद रोड जॉगर्स पार्कच्या डागडुजीच्या कामास प्रारंभ



**देवळाली कॅम्प ।** आनंद रोडवरील जॉगर्स पार्कची दुविधाअभावी दुरावस्था झाली होती. याबाबत नागरिकांनी नव्याने नामनिर्देशित कँटोनमेंट बोर्ड सदस्य सचिन ठाकरे यांची भेट घेऊन त्यांना लेखी तक्रार सादर केली. या तक्रारी वर ५० हून अधिक नागरिकांनी स्वाक्षऱ्या केल्या होत्या.

नागरिकांच्या मागणीला त्वरित प्रतिसाद देत ठाकरे यांनी नागरिकांसोबत थेट मैदानाची पाहणी केली. त्यांनी त्वरित अमन गुप्ता आणि स्वप्नील क्षत्रिय यांना मैदानावर बोलावून आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यांच्या तातडीच्या निर्णयामुळे २४ तासांतच मैदानावर सुधारणा करण्याचे काम सुरू झाले. जॉगिंग ट्रॅकवर ४ ते ५ ट्रिप मुरूम टाकण्यात आला. मैदानाची स्वच्छतादेखील सुरू झाली आहे. मैदानावरील शौचालये सुस्थितीत ठेवण्यासाठी विशेष व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला. गेटवर सुरक्षारक्षक तैनात करण्याचे आदेश देण्यात आले. मैदान हरित करण्यासाठी बोअरवेल आणि ठिबक सिंचन यंत्रणेची व्यवस्था करण्याचे यावेळी सांगण्यात आले. तोपर्यंत दर दोन दिवसांनी कँटोनमेंट बोर्डाच्या पाण्याच्या टँकरद्वारे झाडांना पाणी देण्याचा निर्णय घेण्यात आला. सचिन ठाकरे यांच्या तात्काळ दखल घेण्याबद्दल नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

## विद्यार्थ्यांनी केला डेल्टा फिनोकेम कंपनीचा अभ्यास दौरा

**नाशिक ।** येथील के.व्ही.एन. नाईक कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील ३५ विद्यार्थ्यांनी नुकताच औद्योगिक दौरा केला. नाशिकमधील औषधनिर्मिती कंपन्यांपैकी एक असलेल्या डेल्टा फिनोकेम प्रा.लि. या कंपनीस विद्यार्थ्यांनी भेट दिली. विद्यार्थ्यांना ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इंग्रेडियंट्स (ए.पी.आय) निर्मिती प्रक्रियेची सखोल माहिती मिळावी, संशोधन आणि विकास, आधुनिक उपकरणांचा वापर, उत्पादनाचे विपणन आणि औषध उद्योगातील करिअर संधी यांचा प्रत्यक्ष अनुभव यावा यासाठी सदरचा दौरा घेण्यात आला. याप्रसंगी पी.पी.टी च्या माध्यमातून कंपनीचे मॅनेजर मुळे यांनी कंपनीची सविस्तर माहिती दिली. केमिस्ट्री विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. जे. नौकुडकर यांचे स्वागत डेल्टा फिनोकेमचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय देशमुख यांनी केले. दत्तात्रय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना औषधनिर्मिती क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन केले आणि भविष्यातील उद्योजकतेसाठी प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांनी ए.पी.आय निर्मितीतील संश्लेषण प्रक्रिया, विविध अभिक्रिया, शुद्धीकरण तंत्रे, क्रिस्टलायझेशन आणि गुणवत्ता नियंत्रणाच्या अत्याधुनिक पद्धती समजावून घेतल्या. अभ्यासदौरा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय सानप यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. विजय नौकूडकर यांच्यासह विभागातील प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

## मद्यधुंद चालकाचा ताबा सुटल्याने ट्रक घुसला द्राक्ष बागेत





**विंचूर ।** विंचूर-लासलगाव महामार्ग लगत असणाऱ्या संजय नंदकिशोर शेवाळे यांच्या द्राक्ष बागेत दुपारी दोनच्या सुमारास ट्रक एम.एच.१५-जेडब्ल्यू ६०४४) घुसल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले. कुठल्याही प्रकारची जीवित हानी मात्र झाली नाही. ट्रकचालक हा दारूच्या नशेत असल्याने हा सर्व प्रकार घडला असल्याचे दिसून येत आहे. दारूच्या नशेत ट्रकचालकाचा ट्रकवरचा ताबा सुटल्याने गाडी थेट महामार्गावरून द्राक्षबागांमध्ये घुसला. त्यामुळे द्राक्ष बागेतील मोठे नुकसान झाले आहे. चार ते पाच वर्षांपूर्वीच हा नवीन द्राक्षबाग संजय शेवाळे यांनी उभा केला होता. अजून दहा ते पंधरा वर्षे यामधून उत्पन्न मिळणार होते; परंतु ट्रक घुसल्याने त्यांचे जवळपास १५ लाखांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे याची नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# पोलिसांप्रती कृतज्ञता प्रेरणादायी : महंत भक्तीचरणदास महाराज

## इंटरनॅशनल ह्युमन राईट्स अंबेसेंटर्स ऑर्गनायझेशन व महाराष्ट्र न्यूज ९९ तर्फे आयोजन

**नाशिक ।** समाजाच्या सुरक्षिततेसाठी दिवस-रात्र काम करणारे पोलिस हेही माणूस आहेत. त्यांनाही भावना आहेत. अडीअडचणी, समस्या आहेत. समाजबांधणीत पोलिसांची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यामुळे त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करणे हे प्रेरणादायी ठरते. त्यामुळेच पोलीस कर्मी आणि त्यांच्या कुटुंबियांचा होत असलेला सन्मान अतिशय स्तुत्य असल्याचे प्रतिपादन महंत डॉ. भक्तीचरणदास महाराज यांनी केले.

इंटरनॅशनल ह्युमन राईट्स अंबेसेंटर्स ऑर्गनायझेशन आणि महाराष्ट्र न्यूज ९९ या वृत्तवाहिनीच्या संयुक्त विद्यमाने पोलिस बांधव आणि त्यांच्या कुटुंबियांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन पंचवटीतील राजयोग मल्टिपर्पज हॉलमध्ये करण्यात आले होते. यावेळी महंत भक्तीचरणदास महाराज यांच्यासह प्रमुख अतिथींच्या हस्ते पोलिस बांधव बांधव आणि त्यांच्या कुटुंबियांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना महाराज बोलत होते.





### पोलिस बांधवांसह कुटुंबियांचा सन्मान

व्यासपीठावर गोरेराम मंदिर पर्णकुटीचे महंत राजारामदासजी महाराज, माजी महापौर अशोक मुर्तडक, इंटरनॅशनल ह्युमन राईट्स अंबेसेंटर्स ऑर्गनायझेशनचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अविनाश सकुंडे, इंटरनॅशनल ह्युमन राईट्स अंबेसेंटर्स ऑर्गनायझेशनचे जिल्हाध्यक्ष अनिल लहामगे, शिवसेना उपमहानगरप्रमुख पप्पू टिळे, नंदू वराडे, एआयजे पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष दीपक भावसार, पोलिस उपनिरीक्षक विजय गिते, सचिन माळोदे, अक्षय बर्वे आदी उपस्थित होते. यावेळी भक्तीचरणदास महाराज यांनी विविध उदाहरणे देत पोलिसांच्या कर्तव्याचे दाखले दिले. यावेळी माजी महापौर अशोक मुर्तडक यांनीही मनोगत व्यक्त केले. कधी काळी त्यांनाही पोलीस म्हणून सेवा बजावलेली असल्याने त्यांनीही अनेक दाखले देत पोलिसांच्या कर्तव्य तथा जबाबदारीची जाणीव करून दिली. सुरेश सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन नंदू वराडे आणि बिपीन कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमात महाराष्ट्र न्यूज ९९ चे संचालक संदीप जोजारे, सुरेश सोनवणे, रुपेश मेहता, मनोज सोनार, बिपीन कुलकर्णी यांनी यशस्वी आजोजन केले तर कार्यक्रम पार पाडण्यासाठी दीप्ती मेहता, शर्वरी जोजारे, नीलेश केदारे, सुनील वाघ, किरण माली, तुषार जाधव यांनी प्रयत्न केले.

# सेन्सेक्स-निफ्टी सपाट बंद





**मुंबई, दि.२५ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजारात आज तीव्र अस्थिरता होती. सेन्सेक्स आणि निफ्टी या दोघांनीही वाढीसह व्यवहाराची सुरुवात केली, परंतु नंतर मजबूत नफा बुकिंग दिसून आले. मात्र, व्यवहाराच्या शेवटी दोन्ही निर्देशांक किरकोळ वाढीसह बंद झाले. सेन्सेक्स 33 अंकांनी वाढून तर निफ्टी 23,668 वर बंद झाला. लहान आणि मध्यम शेअर्समध्ये मात्र मोठी घसरण दिसून आली. बीएसई मिडकॅप निर्देशांक 1.13 टक्क्यांनी आणि स्मॉलकॅप निर्देशांक 1.63 टक्क्यांनी घसरला. त्यामुळे आज शेअर बाजारात गुंतवणूकदारांचे 3.4 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

आयटी वगळता बीएसईचे सर्व क्षेत्रीय निर्देशांकही घसरून बंद झाले. ग्राहकोपयोगी वस्तू, रियल्टी आणि युटिलिटी शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण दिसून आली. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स 32.80 अंकांनी वाढून 78,017.19 वर बंद झाला. निफ्टी 10.30 अंकांच्या वाढीसह 23,668.65 वर बंद झाला.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज 25 मार्च रोजी 414.79 लाख कोटी रुपयांपर्यंत खाली आले आहे, जे त्याच्या मागील

**सेन्सेक्स 78,017**

**निफ्टी 23,668**

ट्रेडिंग दिवशी म्हणजेच सोमवार, 24 मार्च रोजी 418.29 लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप 3.50 लाख कोटी रुपयांनी कमी झाले आहे.

सेन्सेक्समधील 30 पैकी 10 शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये अल्ट्राटेक सिमेंटच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ३.४१ टक्के वाढ झाली. यानंतर बजाज फिनसर्व्ह, इन्फोसिस, ॲक्सिस बँक आणि एचडीएफसी बँकेचे शेअर्स 1.13 ते 2.71 टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले. सेन्सेक्सचे 20 शेअर्स आज तोट्यासह बंद झाले. यामध्येही झोमॅटोचा शेअर 5.79 टक्क्यांच्या घसरणीसह अव्वल ठरला. तर इंडसइंड बँक, अदानी पोर्ट्स, महिंद्रा अँड महिंद्रा (M&M) आणि रिलायन्स इंडस्ट्रीज (RIL) चे शेअर्स 1.23 टक्क्यांपासून 4.76 टक्क्यांपर्यंत घसरले.

कल्पतरू प्रोजेक्ट्स इंटरनॅशनल लिमिटेड (KPIL) च्या शेअर्समध्ये मंगळवारी ५ टक्क्यांनी वाढ झाली आणि एकूण २,३६६ कोटी रुपयांच्या ऑर्डर मिळाल्यानंतर ते १,०३२.६० च्या उच्चांकावर पोहोचले.या वर्षी आतापर्यंत या शेअरमध्ये २३.४१ टक्क्यांहून अधिक घट झाली आहे. दरम्यान, गेल्या पाच वर्षांत या शेअरमध्ये जवळपास ८८ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

# राजधानी दिल्ली महिलांसाठी अधिक सुरक्षित होणार, अर्थसंकल्पात घोषणा

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आज विधानसभेत अर्थसंकल्प सादर करत आहेत. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, "दिल्लीच्या इतिहासात पहिल्यांदाच एतिहासिक अर्थसंकल्प सादर केला जात आहे. दिल्लीचे बजेट १ लाख कोटी रुपये आहे. जे गेल्या वेळेपेक्षा खूपच जास्त आहे. तसेच१ लाख कोटी रुपयांचे एतिहासिक बजेट पुढे दुप्पट केले जाईल, या अर्थसंकल्पातून सर्वांचा विकास होईल, असेही मुख्यमंत्री गुप्ता म्हणाल्या.

**मागील सरकारकडून जनतेचा विश्वासघात**

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी मागील सरकारवर निशाणा साधताना म्हटले आहे की, मागील सरकारने दिल्लीतील जनतेचा विश्वासघात झाला आहे. गेल्या १० वर्षात त्यांनी जनतेला केवळ स्वप्ने दाखवली आणि दिल्लीला पोकळ केले. दारू माफिया आणि पीडब्ल्यूडी कंत्राटदारांना पैसे मिळत असल्याने सरकारचे उत्पन्न कमी झाले. त्यामुळेच दिल्ली विकासात मागे पडली आहे, अशी टीका देखील मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी केजरीवाल सरकारवर केली आहे.

**शहरात ५ हजारांहून अधिक कॅमेरे बसवणार**

दिल्लीच्या विधानसभेत अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी महिला आणि मुलींच्या सुरक्षेसंदर्भातही मोठी घोषणा केली आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता म्हणाल्या, "महिलांच्या सुरक्षेसाठी शहरात ५ हजारांहून अधिक कॅमेरे बसवले जातील. रस्ते आणि पुलांच्या पायाभूत सुविधांसाठी ३८४३ कोटी रुपये वाटप करण्यात आले आहेत. झोपडपट्ट्या आणि जेजे वसाहतींमध्ये मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी ६९६ कोटी रुपये वाटप करण्यात आले आहेत".

**'यमुना' बचावासाठी ५०० कोटी...**

यमुना सांडपाणी आणि प्रदूषित पाण्याशी झुंजत आहे. यमुनेची स्वच्छता ही आमची प्राथमिकता आहे. आम्ही यमुना नदी स्वच्छ करण्यासाठी वचनबद्ध आहोत. ती आमच्यासाठी फक्त एक नदी नाही; ती आमची सांस्कृतिक वारसा आहे. ४० विकेंद्रित सांडपाणी संयंत्रे विकसित करण्यासाठी ५०० कोटी रुपये



वाटप करण्यात आले आहेत, जेणेकरून कोणतेही सांडपाणी थेट यमुना नदीत सोडले जाऊ नये...", असेही मुख्यमंत्री रेखा गुप्ता म्हणाल्या.

**दिल्लीत १०० ठिकाणी 'अटल' कॅन्टीन उघडणार**

मागील सरकारने लोकांना पंतप्रधान आवास योजनेचा लाभ घेऊ दिला नाही. आता तुम्हाला आमच्या सरकारमध्ये फायदे मिळतील. २० कोटी रुपये देण्यात आले आहेत. आमदार निधी पूर्णपणे उपलब्ध असेल. कोणतीही कपात केली जाणार नाही. जेवण कागदावर होते, पण आम्ही ते जनतेला ताटात देऊ. दिल्लीत १०० कोटी रुपयांच्या निधीतून १०० ठिकाणी अटल कॅन्टीन उघडली जातील. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त दिल्लीत कॅन्टीन उघडण्यात येणार आहेत.

**दिल्लीतील कचऱ्याचे डोंगर लवकरच हटवणार**

मुख्यमंत्री रेखा गुप्ता म्हणाल्या की,"तुम्ही तुमचा शीशमहाल बांधला आहे. आम्ही आमच्या जवळच्या लोकांसाठी घरे बांधू. आम्ही गरिबांसाठी शौचालये बांधू. तुम्ही जाहिरातींवर कराचे पैसे खर्च केले. निवडणुकीत पैसे गुंतवले. तुमच्यात आणि आमच्यात खूप फरक आहे. आम्ही राजधानी दिल्लीतील कचरा साफ करू आणि कचऱ्याचे डोंगर लवकरच काढून टाकू".

मुख्यमंत्री गुप्ता म्हणाल्या, "व्यापाऱ्यांसाठी व्यापार कल्याण मंडळ स्थापन केले जाईल. दिल्लीत उद्योगांचा विकास झाला नाही. आम्ही लोकांना रोजगार देऊ. आमचे सरकार दिल्लीत एक नवीन औद्योगिक धोरण आणेल".

दिल्लीमध्ये गटार आणि पाण्यासारख्या समस्या आहेत. स्वच्छ पाण्यासाठी नऊ हजार कोटी रुपये वाटप केले जातील. पाण्याच्या टँकरमध्ये जीपीएस बसवले जाईल, असे देखील दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी अर्थसंकल्प सादर करताना म्हटले आहे.

# पाकव्याप्त काश्मीर खाली करावा लागेल
## UN मध्ये भारताचा पाकिस्तानला इशारा

**न्यूयॉर्क, दि. २५ वृत्तसंस्था**

संयुक्त राष्ट्रांच्या शांतता प्रस्थापित सुधारणांवरील चर्चेदरम्यान जम्मू आणि काश्मीरचा मुद्दा पुन्हा एकदा उपस्थित केल्याबद्दल भारताने मंगळवारी पाकिस्तानला जोरदार फटकारले. पाकिस्तानने बेकायदेशीरपणे जो काही प्रदेशातील भाग व्यापला आहे तो खाली करावा लागेल, असा इशारा भारताने दिला आहे.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत संबोधित करताना भारताचे स्थायी प्रतिनिधी, राजदूत पार्वतनेनी हरीश यांनी जम्मू आणि काश्मीरचा पाकिस्तानकडून करण्यात आलेला वारंवार उल्लेख 'अयोग्य' असल्याचे म्हटले. तसेच त्यांनी हा प्रदेश भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि नेहमीच राहील, अशा शब्दांत पुनरुच्चार केला.

"भारताला याची दखल घ्यावी लागत आहे की पाकिस्तानच्या प्रतिनिधीने पुन्हा एकदा भारताचा केंद्रशासित प्रदेश जम्मू आणि काश्मीरबाबत अनावश्यक टिप्पणी केली. असा वारंवार उल्लेख



केल्यामुळे त्यांचे बेकायदेशीर दावे सिद्ध होत नाहीत अथवा त्यांच्या सीमापार दहशतवादाचे समर्थन होत नाही," असे हरीश यांनी पाकिस्तानला बजावून सांगितले.

भारतीय राजदूतांनी या मुद्यावर देशाच्या दीर्घकालीन भूमिकेला दुजोरा देत नमूद केले की, "जम्मू आणि काश्मीर भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि नेहमीच राहील." पाकिस्तान जम्मू आणि काश्मीरच्या काही भागांवर बेकायदेशीरपणे कब्जा मिळवत असल्याचे सांगत त्यांनी या प्रदेशावरील ताबा सोडावा लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

"पाकिस्तान जम्मू आणि काश्मीरचा भूभाग बेकायदेशीरपणे कब्जा करत आहे. तो त्यानी खाली केला पाहिजे. आम्ही पाकिस्तानला सल्ला देतो की त्यांनी त्यांचा संकुचित दृष्टीकोन आणि फुटीरवादी अजेंडा पुढे रेटण्यासाठी या मंचाचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करू नये, असेही हरीश म्हणाले.

गेल्या आठवड्यातही भारताने जिनिव्हा येथील संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेच्या (UNHR) बैठकीत पाकिस्तानला फटकारले होते. जम्मू आणि काश्मीरमध्ये मानवाधिकाराचे उल्लंघन झाल्याचे आरोप फेटाळून लावले होते.

# भारत आमच्या निवडणुकीत हस्तक्षेप करु शकतो!- कॅनडा

**ओट्टावा, दि. २५ वृत्तसंस्था**

आपल्या भूमीवर सक्रिय असलेल्या भारतविरोधी आणि खलिस्तानी समर्थकांना प्रोत्साहन देत असणाऱ्या कॅनडाने पुन्हा एकदा भारतावर गंभीर आरोप केला आहे. भारत आणि चीन २८ एप्रिल रोजी कॅनडामध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर करुन हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करू शकतात, असा दावा कॅनडाच्या गुप्तचर संस्थेच्या उपसंचालक व्हेनेसा लॉयड यांनी केला आहे. दरम्यान, यापूर्वीही कॅनडाने असेच आरोप केले होते जे भारताने पूर्णपणे फेटाळून लावले आहेत.

इटलीचे नवनियुक्त पंतप्रधान मार्क कार्नी यांनी २८ एप्रिल रोजी मुदतपूर्व निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला आहे. कॅनडाच्या गुप्तचर संस्थेने सोमवारी दावा केला की, भारत आणि चीन आगामी कॅनडाच्या सार्वत्रिक निवडणुकीत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करू शकतात. तसेच रशिया आणि पाकिस्तान देखील असे करण्याचा प्रयत्न करू शकतात.

कॅनेडियन सिक्युरिटी इंटेलिजेंस सर्व्हिसच्या उपसंचालक व्हेनेसा लॉयड म्हणाल्या की, विरोधी सरकारी घटक निवडणुकीत हस्तक्षेप करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत्या प्रमाणात करत आहेत. "पीआरसी (पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना) कॅनडाच्या लोकशाही प्रक्रियेत, या सध्याच्या निवडणुकीसह, हस्तक्षेप करण्यासाठी एआय-सक्षम साधनांचा वापर करेल अशी दाट शक्यता आहे." भारत सरकारकडे कॅनेडियन समुदायांमध्ये आणि लोकशाही प्रक्रियांमध्ये हस्तक्षेप करण्याचा हेतू आणि क्षमता आहे," असा दावाही त्यांनी केला आहे.

# पुण्यात कचऱ्याच्या ढिगाऱ्यात सापडले गर्भ आणि मानवी अवशेष

**पुणे, दि. २५ प्रतिनिधी**

दौंड शहरालगत असणाऱ्या बोरावके नगरमध्ये प्राईम टाऊनच्या पाठीमागे कचऱ्याच्या ढिगाऱ्यात मानवी गर्भ आणि शरीराचे काही अवशेष आढळून आल्याची माहिती मिळाली आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

प्रथमदर्शनी हे गर्भ आणि मानवी शरीराचे अवशेष हे प्रयोगशाळेतील नमुने असल्याची माहिती मिळत असली तरी हा गर्भपाताचा प्रकार आहे का या दृष्टीने देखील पोलीस तपास करीत आहेत. स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी पोलिसांच्या ११२ क्रमांकाला फोन करून या संदर्भातील माहिती दिली.

यानंतर या ठिकाणी दौंड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पाहणी अंती पंचनामा करून डॉक्टरांचे वैद्यकीय पथक या ठिकाणी बोलावले. हे गर्भ आणि अवशेष ताब्यात घेण्यात आले असून या ठिकाणी कसे आले याचा शोध आता घेतला जात आहे. वैद्यकीय तज्ञांच्या अहवालानुसार यानंतर पोलीस पुढील कारवाई करणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार,हे गर्भ आणि काही मानवी शरीराचे अवशेष सीलबंद बरणीत असून त्यावरती त्या संदर्भातील माहिती देखील आहे आणि ते २०२० मधील आहेत अशी माहिती आता सूत्रांकडून मिळत आहे. मात्र हे कचऱ्याच्या ढिकाऱ्यात कसे आले याचा शोध घेतला जात आहे.

# मोनेरा फाउंडेशन देतेय पर्यावरण अन् ग्रामविकासाला दिशा

परिसरातील पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जागृती हा हेतू ठेऊन शाहूवाडी [जिल्हा कोल्हापूर] तालुक्यातील महाविद्यालयीन युवक युवतींनी एकत्र येत २०१२ मध्ये मोनेरा फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली. संस्थेतर्फे देवराई संवर्धन, विद्यार्थ्यांसाठी निसर्ग विज्ञान शिबीर, पर्यटन मार्गदर्शन, असे उपक्रम राबविले जातात. जागतिक वारसा लाभलेला पश्चिम घाट जैव विविधतेने समृद्ध आहे. पश्चिम घाटाचा एक पट्टा कोल्हापूर जिल्ह्यात आहे.या जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी शाहूवाडी तालुक्यातील आंबा गाव परिसरात मोनेरा फाउंडेशन [मेंबर्स ऑफ नॅचरल इकोलॉजिकल रिसर्च असोशिएशन] या स्वयंसेवी संस्थेने आपले कार्य सुरु केले. संस्था लोकसहभागातून ग्रामीण भागात जैवविविधता संरक्षण, बालशिक्षण, महिला सशक्तीकरण आणि ग्रामविकासामध्ये कार्यरत आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच सामाजिक जाणिवेतून समविचारी मित्रमैत्रिणींना एकत्र करत अजिंक्य बेर्डे यांनी या संस्थेची स्थापना केली. वैभव पाटील हे सांस्थेचे अध्यक्ष असून प्रज्ञा कांबळे या उपाध्यक्ष आहेत.



**लोकसेवार्थ**

मोनेरा फाउंडेशन संस्थेचे सदस्य स्व खर्चातून विविध उपक्रम लोकांच्या सहकार्याने राबवित असतात. निसर्ग संवर्धनाबरोबरच संशोधन आणि प्रबोधन वाढीस लागावे, ग्रामीण भागातून जास्तीत जास्त विद्यार्थी शिक्षण आणि संशोधन क्षेत्राकडे वळावेत यासाठी संस्था प्रयत्नशील असते. महिलांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन,आरोग्य शिबिरांचे आयोजन संस्थेतर्फे केले जाते. संस्थेचे सदस्य वाढदिवसानिमित्त दुर्गम वाडी वस्तीवरील शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तूंचे वाटप करतात. वन्यजीवांसाठी पाणवठे, प्लास्टिकमुक्त जंगल, जंगलातील वाढता मानवी हस्तक्षेप,वन्यजीव आणि मानव संघर्ष वाढीस नेतो याचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसून आले कि, उन्हाळ्यात जंगलातील पाणीटंचाईमुळे गवे शेतामध्ये शिरतात.गेल्या चार वर्षांपासून संस्थेने आंबा जंगलातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी पाणवठे पुनरुज्जीवन आणि निगा राखण्याचा उपक्रम सुरु केला. संस्थेतर्फे जंगलातील वाघझरा, मानोली धरन, आंबेश्वर देवराई, पावनखिंड परिसरात स्वच्छता मोहीम राबविली जाते. जंगल स्वच्छ आणि सुंदर राहावे यासाठी जनजागृती केली जाते. रासायनिक रंगांचे महत्व लक्षात घेऊन संस्थेच्या माध्यमातून विविध गावातील शाळांमधून दरवर्षी नैसर्गिक रंगनिर्मिती आणि त्यांचे महत्व या संधर्भात शाळांमध्ये कार्यशाळा घेल्या जातात. शिवाय सांस्थेच्या माध्यमातून ग्रामस्थांनी पन्हाळा परिसरातील दिगवडे या गावात हक्काचे ग्रामोदयाने ही संकल्पना देखील यशस्वी करून दाखवली आहे. मलकापूर जवळील मुटकेश्वर टेकडीवर संस्थेच्या माध्यमातून देवराई फुलवली गेली आहे. संस्थेच्या याच पर्यावरण विषयक आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमाबद्दल मोनेरा संस्थेला कोल्हापूर येथील व्ही.टी.पाटील फाउंडेशन तर्फे राजलक्ष्मी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. एकूणच ,मोनेरा फाउंडेशन सारखी पर्यावरण संवर्धक संस्था म्हणजे उद्याच्या पिढीचे संरक्षक आहेत असच म्हणता येईल.

**लोकजागर**

# पत्नीने आईच्या मदतीने केली पतीची हत्या

**बेंगळुरू, दि. २५ वृत्तसंस्था**

कर्नाटकमधील बेंगळुरूमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. एका ३७ वर्षीय रिअल इस्टेट व्यावसायिकाची पत्नी आणि सासूने हत्या केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. लोकनाथ सिंह असं हत्या करण्यात आलेल्या व्यावसायिकाचं नाव होतं, अशी माहिती सांगितली जात आहे. या घटनेनंतर पोलिसांनी लोकनाथ सिंह यांची पत्नी यशस्विनी आणि सासू हेमाबाई यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकनाथ सिंह यांचे कथित अवैध संबंध आणि व्यावसायिक व्यवहार हे या हत्यामागचं कारण असल्याची प्राथमिक माहिती समोर येत असल्याचं सांगितलं आहे. ही घटना शनिवारी उघडकीस आली. काही लोकांनी लोकनाथ सिंह यांचा मृतदेह चिक्कबनावरा येथील परिसरात कारमध्ये आढळून आला आणि यानंतर ही घटना उघडकीस आली.

२२ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजताच्या दरम्यान पोलिसांना ११२ क्रमांकावर एक फोन आला. त्यानंतर पोलिसांना या घटनेबाबत माहिती देण्यात आली. यानंतर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले, तेव्हा त्यांना एका कारमध्ये लोकनाथ यांचा मृतदेह आढळून आला. यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलिसांनी सुरु केला आणि ही हत्या आर्थिक वादातून झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली. डिसेंबर २०२४ मध्ये लोकनाथ आणि यशस्विनी यांनी घरच्यांना न सांगता लग्न केलं. मात्र, ही गोष्ट यशस्विनीच्या कुटुंबापासून लपवून ठेवण्यात आली होती. तसेच लग्नानंतरही लोकनाथने आपल्या पत्नीला तिच्या पालकांच्या घरीच ठेवलं होतं. या दोघांच्या वयातील लक्षणीय अंतरामुळे कुटुंबाचा या लग्नाला विरोध होता, म्हणून या दोघांनी घरच्यांना न सांगता लग्न केलं होतं. मात्र, दोन आठवड्यांपूर्वी यशस्विनीच्या कुटुंबाला सत्य काय ते समजलं आणि नाट्यमय घडामोडी घडल्या.

दरम्यान, लोकनाथच्या विवाहबाह्य संबंधांचे आणि संशयास्पद व्यावसायिक व्यवहारांचे आरोप त्याच्यावर करण्यात आले. यामधून वादविवाद वाढले आणि घटस्फोटाच्या चर्चा सुरू झाल्या. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, लोकनाथने त्याच्या पत्नी आणि सासूला धमकावण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे त्यांनी त्याच्या हत्येचा कट रचला. प्राथमिक तपासात अशी माहिती समोर आली की, आरोपीने लोकनाथलाच्या जेवणातून औषध दिले होते. तसेच त्यानंतर यशस्विनीने त्याला चिक्काबनावरा येथील एका परिसरात नेलं, तेव्हा तिची आई पाठिमागून एका रिक्षातून आली. त्यानंतर एका निर्जनस्थळी नेहून लोकनाथचा गळा कारमध्येच आवळून हत्या करण्यात आली.

# टॅरिफ वादाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे शिष्टमंडळ भारत दौऱ्यावर

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांना वाढीव शुल्क लादण्याचा इशारा दिल्यामुळे जगभरात अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अशातच, भारताने द्विपक्षीय व्यापार करारांतर्गत अमेरिकन उत्पादनांवरील शुल्क कमी करण्याचे संकेत दिल्यानंतर एक उच्चस्तरीय अमेरिकन शिष्टमंडळ भारत दौऱ्यावर आहे. यामध्ये दक्षिण आणि मध्य आशियासाठी सहाय्यक यूएस ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह ब्रॅंडन लँचेस यांचाही समावेश आहे.

अमेरिकन शिष्टमंडळाचा हा दौरा अशा वेळी होणार आहे, जेव्हा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 2 एप्रिलपासून परस्पर शुल्क लागू करण्याची घोषणा केली आहे. भारतातून निर्यात होणारी कृषी उत्पादने, मांस, प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ, वाहने, हिरे, सोन्याची उत्पादने तसेच रसायने आणि औषधी उत्पादनांवर याचा परिणाम होण्याची भीती आहे. यावरील टॅरिफमधील फरक 8 ते 33 टक्क्यांपर्यंत असू शकतो.

मात्र, दुसरीकडे आर्थिक थिंक टँक GTRI (ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह) ने याबाबत इशारा दिला आहे. जीटीआरआयने मंगळवारी सांगितले की, भारताने अमेरिकेसोबत प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार कराराची वाटाघाटी करताना सावधगिरी बाळगली पाहिजे, कारण यूएसमध्ये फास्ट ट्रॅक ट्रेड अथॉरिटी नसल्यामुळे कोणताही करार काँग्रेसने केलेल्या बदलांना असुरक्षित बनवतो.


जीटीआरआयने पुढे म्हटले की, प्रमाणीकरण प्रक्रिया यूएसला व्यापार करारावर स्वाक्षरी केल्यानंतर प्रभावीपणे पुन्हा निगोशिएट करण्याची परवानगी देते. यासाठी देशांतर्गत कायदेशीर बदल, नियामक सुधारणा आणि धोरणात्मक बदलांची गरज आहे. यामुळे भारताचे सार्वभौमत्व कमकुवत होऊ शकते. ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह (जीटीआरआय) चे संस्थापक अजय श्रीवास्तव म्हणतात, वाटाघाटी सुरू असताना केवळ राजनयिक चतुराईची गरज नाही, तर यूएस व्यापार धोरणामध्ये अंतर्भूत असलेल्या कायदेशीर असमानतेबद्दल सतर्कता देखील आवश्यक आहे.

# उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग चालवा अन् बदली रद्द करा!

## अलाहाबाद बार असोसिएशनची मागणी

**प्रयागराज, दि. २५ वृत्तसंस्था**

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या घरी सापडलेल्या १५ कोटींच्या रोकडप्रकरणी त्यांच्याविरुद्ध महाभियोग चालवण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी आक्रमक मागणी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनने केली आहे. सरकारने यासाठी शिफारस करावी, असेही बार असोसिएशनने म्हटले आहे. दरम्यान, न्या. वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याच्या निर्णयाविरुद्ध संप पुकारण्याचा इशारा वकिलांनी दिला आहे.



बार असोसिएशन अध्यक्ष अनिल तिवारी यांनी या प्रकरणात गुन्हे दाखल करून त्याची सीबीआय आणि ईडीसह इतर संस्थांमार्फत चौकशी करण्याची तत्काळ परवानगी द्यावी, असे नमूद केले. गरज पडल्यास वर्मा यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्याची परवानगी द्या, अशी आक्रमक मागणीही त्यांनी केली.

सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालील कॉलेजियमने सोमवारी वादग्रस्त न्यायाधीश वर्मा याची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यासंबंधीच्या निर्णयाची पुष्टी केली.

सर्व नेते एकत्र: राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी रोख रकमेच्या प्रकरणात सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी तातडीने घेतलेल्या निर्णयांची प्रशंसा केली. यांप्रकरणी भाजपचे नेते जे. पी. नड्डा आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी झालेल्या बैठकीत धनखड यांनी समितीचा अहवाल येईपर्यंत वाट पाहण्याचा निर्णय घेतला असल्याचेही ते म्हणाले

# सुझुकी मोटरसायकलची सुझुकी एवेनिस आणि सुझुकी बर्गमन स्कूटर लाँच

सुझुकी मोटर कॉर्पोरेशन, जपानची दुचाकी उपकंपनी सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने त्यांच्या OBD-2B अनुपालन स्कूटर - सुझुकी एवेनिस आणि सुझुकी बर्गमन मालिका (बर्गमन स्ट्रीट आणि बर्गमन स्ट्रीट EX) लॉंच करण्याची घोषणा केली आहे.



अपडेटेड सुझुकी एवेनिस आणि सुझुकी बर्गमन सिरीजच्या सादरीकरणासह, SMIPL च्या संपूर्ण स्कूटर पोर्टफोलिओ (ॲक्सेस, एवेनिस, बर्गमन स्ट्रीट आणि बर्गमन स्ट्रीट EX) आणि मोटारसायकली (V-Strom, GIXXER SF 250, GIXXER 250, GIXXER SF आणि GIXXER) आता OBD-2B अनुरूप आहेत.

**चलती का नाम गाड़ी**

ग्राहकांना आणखी आनंद देत, सुझुकी एवेनिस आता एका विशेष आवृत्तीमध्ये ऑफर केली जात आहे जी नवीन रंग संयोजनात येते - मेटॅलिक मॅट ब्लॅक नंबर 2 / मॅट टायटॅनियम सिल्व्हर तर बर्गमन स्ट्रीट EX आता बाजारात उपलब्ध असलेल्या विद्यमान रंगांव्यतिरिक्त नवीन मेटॅलिक मॅट स्टेलर ब्लू रंगात उपलब्ध आहे.या घोषणेवर भाष्य करताना, श्री. केनिची उमेदा - व्यवस्थापकीय संचालक, सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रा. लि. लिमिटेड म्हणाले, "सुझुकी मोटरसायकल इंडियामध्ये, आम्ही आमच्या ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करतो आणि त्याचबरोबर नवीनतम नियमांचे पालन सुनिश्चित करतो. आमच्या संपूर्ण उत्पादन श्रेणीचे OBD-2B अनुपालनाकडे संक्रमण हे अधिक स्वच्छ आणि अधिक शाश्वत रायडिंग अनुभव प्रदान करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. एवेनिस आणि बर्गमन स्ट्रीट EX साठी नवीन रंग पर्याय सादर करून, आम्हाला आमच्या ग्राहकांना अधिक मूल्य आणि निवड आणण्याची आशा आहे.''

# हिंसाचारप्रकरणी नुकसानभरपाई दगेखोरांकडून, निर्णय योग्य की अयोग्य?

**वाद संवाद**

**१)संतोष साठे (समाजसेवक)**

होय अलीकडेच औरंगजेबाच्या प्रकरणावरून नागपूर मध्ये काही समाजकंटकांनी जो पूर्वनियोजित हिंसाचार घडविला आणि समाजात अशांतता पसरविण्याचा जो प्रयत्न केला तो घृणास्पद होता.या दंगलीत सार्वजनिक मालमत्तेची अतोनात हानी झाली. प्रचंड नुकसान झाले.हे नुकसान सर्व सामान्यांच्या मालमत्तेचेच होते म्हणूनच या झालेल्या नुकसानाची भरपाई या दंगलीत पकडल्या गेलेल्या दगल खोरांकडूंच केली जाईल हा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतलेला निर्णय अतिशय योग्य असाच आहे.अशामुळे आता अशी दंगल घडवून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या गुंडांना चांगलाच चाप बसणार आहे.हाच निर्णय आता यापुढे असा हिंसाचार करणाऱ्या सर्वानाच लागू व्हावा.

**२)विनोद शर्मा ( कार्यकर्ता)**

नागपूर मधील दंगलीत जे अतोनात नुकसान झाले त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही नुकसान भरपाई हिंसाचार घडविणाऱ्या लोकांकडून वसूल करण्याचा घेतलेला निर्णय योग्य वाटत असला तरी अशा प्रकरणांमध्ये होरपळले.जातात ते सर्वसामान्य कार्यकर्ते. या कार्यकर्त्यांचा बोलविता धनी हा वेगळाच असतो.म्हणूनच या कार्यकर्त्यांना असा विध्वंस करण्यास प्रवृत्त करणाऱ्या विविध राजकीय किंवा सामाजिक पक्षांच्या नेत्यांना या प्रकरणी जबाबदार धरून त्यांच्या पक्षाकडून अशी भरपाई वसूल केली जायला हवी असे वाटते. आणि अशा हिंसाचार प्रकरणी दोन्ही बाजू समजून घेऊन मगच योग्य तो दंडात्मक.निर्णय घेतला जावा अशी अपेक्षा आहे.

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# वडिलांना राग अनावर, मुलीच्या एक्स बॉयफ्रेंडची केली हत्या

**अहमदाबाद, दि. २५ वृत्तसंस्था**

गुजरातच्या ग्रामीण अहमदाबादमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. मुलीच्या एक्स बॉयफ्रेंडची तिच्या वडील आणि भावाने निर्घृण हत्या केली. याप्रकरणी पोलिसांनी भावाला अटक केली असून वडील फरार आहेत.

रविवारी, एका कार्यक्रमात शांतुभा आणि रीना एकमेकांकडे पाहत आणि हसत असल्याचे पाहून रीनाचा भाऊ विशालसिंह विक्रमसिंह सोलंकी आणि त्याचे वडील विक्रमसिंह सरदारसिंह सोलंकी यांना राग अनावर झाला. परिणामी त्यांनी शांतुभा झनुभा सोलंकी (२९) याची चाकूने वार करून हत्या केली.

देत्रोज तालुक्यातील भाट वासना गावात एका सामुदायिक कार्यक्रमानंतर ही घटना घडली. दोन्ही आरोपींनी खून करण्यासाठी मोठ्या चाकूचा वापर केला, असे देत्रोजचे निरीक्षक एस.ए. गढवी यांनी सांगितले. साणंदच्या उपविभागीय पोलीस अधिकारी (एसडीपीओ) नीलम गोस्वामी म्हणाल्या, "महिला आणि



मृतक सुमारे सहा वर्षांपासून प्रेमसंबंधात होते, परंतु कुटुंबाने ते गुप्त ठेवले आणि चार वर्षांपूर्वी महिलेचे दुसऱ्या मुलाशी लग्न लावून दिले." विशेष म्हणजे, शांतुभाचेही लग्न दुसऱ्या गावातील महिलेशी झाले होते.

पोलिसांच्या निवेदनानुसार, कुटुंबाने रीनाला शांतुभाशी फोनवर बोलताना एकले होते. रविवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास, शांतुभा आणि महिलेच्या भावामध्ये भांडण झाले. या भांडणात शांतुभा गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला, असे निवेदनात म्हटले आहे.

महासागर NASHIK
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com